




संस्थापक कै. आचार्य गुंदेचा

# नवा मराठा

संपादक : सुभाष गुंदेचा — व्यवस्थापक : अनिकेत गुंदेचा




रजि नं. ११४३९-५७/३७ | पाने ८ | किंमत ३ रूपये | अहिल्यानगर, बुधवार दि. २०.११.२०२४ | अंक नं. २१९ | वर्ष ६७ वे | दैनिक वर्ष ६१ वे | ANR/022/2018-2020




# अहमदनगर शहर मतदारसंघात दुपारपर्यंत किरकोळ अपवाद वगळता ‘शांततेत मतदान’

## शहर मतदारसंघात दुपारी ३ वाजेपर्यंत ४४.१७ टक्के मतदान, सर्वाधिक ५४.७४ टक्के मतदान नेवासा मतदारसंघात

नगर – अहमदनगर जिल्ह्यातील बाराही विधानसभा मतदारसंघात बुधवारी (दि. २०) दुपारपर्यंत शांततेत आणि सुरळीत मतदान पार पडत असून, दुपारी ३ वाजेपर्यंत जिल्ह्यात ४७.८५ टक्के मतदान झाले आहे. निवडणुकीसाठी सर्व मतदारसंघामध्ये कडेकोट पोलिस बंदोबस्त तैनात असून, मतदार घराबाहेर पडून उत्स्फूर्तपणे मतदान करत आहेत. अहमदनगर शहर विधानसभा मतदारसंघात किरकोळ अपवाद वगळता शांततेत मतदान पार पडत आहे. दुपारी ३ वाजेपर्यंत शहर मतदारसंघात ४४.१७ टक्के मतदान झाले आहे.

विधानसभा निवडणुकीत जिल्ह्यातील सर्व बारा मतदारसंघात महायुती विरुद्ध महाविकास आघाडी असा सामना पाहायला मिळत आहे. या निवडणुकीसाठी सकाळी ७ वाजल्यापासून मतदानास सुरुवात झाली. शहर मतदारसंघात सकाळच्या सत्रात मतदानाचा टक्का कमी होता. परंतु ९ वाजल्यानंतर मतदार घराबाहेर पडल्याने मतदानाला वेग आला. शहरातील अनेक मतदान केंद्रावर मतदारांनी रांगेत उभे राहून आपला मतदानाचा हक्क बजावला. विशेषतः केडगाव उपनगरात सकाळच्या सत्रात मतदान केंद्राबाहेर मतदारांच्या लांबच्या लांब रांगा लागल्या होत्या. मतदान प्रक्रियेत दिव्यांग, वृद्ध यांनी सहभाग घेत मतदान केले.

महायुतीचे उमेदवार संग्राम जगताप, महाविकास आघाडीचे उमेदवार अभिषेक कळमकर, मनसेचे उमेदवार सचिन डफळ यांच्यासह प्रमुख राजकीय नेते, पदाधिकारी यांनी आपला मतदानाचा हक्क बजावला. राहुरी मतदारसंघातील उमेदवार शिवाजीराव कर्डिले यांनी बुऱ्हाणनगर येथे आपल्या मतदानाचा हक्क बजावला. दुपारी उशिरापर्यंत मतदान केंद्राबाहेर मतदारांच्या लागलेल्या होत्या.

जिल्ह्यातील १२ मतदारसंघापैकी दुपारी ३ वाजेपर्यंत सर्वाधिक मतदान नेवासा या मतदारसंघात ५४.७४ टक्के नोंदवले गेले तर सर्वात कमी ४०.१३ टक्के मतदानाची नोंद श्रीगोंदा या मतदारसंघात झाली.

| मतदारसंघाचे नाव | ९ वाजेपर्यंत झालेले मतदान | ११ वाजेपर्यंत झालेले मतदान | १ वाजेपर्यंत झालेले मतदान | ३ वाजेपर्यंत झालेले मतदान |
|---|---|---|---|---|
| २१६ – अकोले | ५.३ | १९.८ | ३७.६४ | ५३.१९ |
| २१७– संगमनेर | ६.९३ | २०.६५ | ३४.९३ | ५०.६ |
| २१८ – शिर्डी | ८.१९ | १९.५४ | ३२.८९ | ५३.८७ |
| २१९ – कोपरगाव | ६.५६ | २१.१ | ३६.९६ | ५२.३९ |
| २२० – श्रीरामपूर | ५.१२ | १२.८ | २९.१६ | ४२.३२ |
| २२१ – नेवासा | ७.७३ | २२.२७ | ३८.६ | ५४.७४ |
| २२२ – शेवगाव | ५.६ | १७.७८ | २९.१८ | ४२.६३ |
| २२३ – राहुरी | ५ | १५.९ | ३०.५ | ४५.९ |
| २२४ – पारनेर | ४.४५ | १७.४२ | ३२.९ | ४६.९१ |
| २२५ – अहमदनगर शहर | ५.८ | १६.९२ | ३०.८३ | ४४.१७ |
| २२६ – श्रीगोंदा | ४.५३ | १५.२६ | २७.४८ | ४०.१३ |
| २२७ – कर्जत जामखेड | ६.३४ | २०.७८ | ३६.२९ | ५१.१६ |


मतदानाचा हक्क बजावल्यानंतर संग्राम जगताप यांच्यासमवेत मंगल भक्त सेवा मंडळाचे अध्यक्ष राजाभाऊ कोठारी.


**महाविकास आघाडीचे उमेदवार अभिषेक कळमकर**

नगर शहर विधानसभा मतदार संघातील महाविकास आघाडीचे उमेदवार अभिषेक कळमकर यांनी सावेडी येथील सेंट मोनिका विद्यालयाच्या मतदान केंद्रावर सपत्नीक मतदानाचा हक्क बजावला.


**शिवाजीराव कर्डिले यांनी बुऱ्हाणनगर येथील मतदान केंद्रावर केले मतदान**

राहुरी-नगर-पाथर्डी विधानसभा मतदारसंघातील भाजपचे उमेदवार शिवाजीराव कर्डिले यांनी बुधवारी सकाळी बुऱ्हाणनगर येथील मतदान केंद्रावर मतदानाचा हक्क बजावला.





मनसेचे उमेदवार सचिन डफळ यांनी परिवारसह मतदान केले


मतदानासाठी आलेल्या मतदारांचे गुलाबपुष्प देवून स्वागत करताना महापालिका आयुक्त यशवंत डांगे. समवेत प्रसिद्धी अधिकारी शशिकांत नजान.


श्रीमती मंदाकिनी रावसाहेब बारस्कर या वृद्धेने मतदान केले.




# मतदानासाठी आलेल्यांचे गुलाब पुष्प देऊन स्वागत दिव्यांग बांधवांसाठी व्हील चेअर, पाण्याची व्यवस्था

## अहिल्यानगर शहरात आदर्श मतदान केंद्रांची महानगरपालिकेकडून उभारणी

नगर – अहिल्यानगर शहरातील मतदारांमध्ये जनजागृती करून मतदानाचा टक्का वाढविण्यासाठी प्रयत्न करणाऱ्या महानगरपालिकेमार्फत शहरात दोन आदर्श मतदान केंद्रांची उभारणी करण्यात आली. आयुक्त तथा प्रशासक यशवंत डांगे यांच्या पुढाकारातून हा उपक्रम राबवण्यात आला. मतदान केंद्रांवर दिव्यांग बांधवांसाठी व्हिल चेअर व मतदारांसाठी पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करण्यात आली. या मतदान केंद्रांवर आयुक्त यशवंत डांगे यांनी मतदारांचे गुलाब पुष्प देऊन स्वागत केले.

शहरात डॉ. बाबासाहेब आंबेडकर प्राथमिक शाळा, क्रमांक ४, रेल्वे स्टेशन समोर आणि महात्मा ज्योतिबा फुले प्राथमिक विद्यालय, सावेडी या दोन ठिकाणी मतदान केंद्रांवर सजावट करण्यात आली. मतदारांसाठी मंडप, शोभिवंत झाडांच्या कुंड्या, फुग्यांची सजावट करण्यात आली. मतदान जागृतीचे फलक व सेल्फी पॉइंट लावण्यात आले. आयुक्त यशवंत डांगे यांनी मतदारांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले.

शहरातील सर्व मतदान केंद्रांवर दिव्यांग बांधवांसाठी व्हील चेअरची व्यवस्था, हिरकणी कक्ष, तसेच पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करण्यात आली. गेल्या दोन दिवसात मतदान केंद्रांची स्वच्छता करण्यात आली. तसेच, स्वच्छता गृहाची व्यवस्था करण्यात आली.

शहरात अधिकाधिक मतदान व्हावे, यासाठी अहिल्यानगर महानगरपालिकेच्या वतीने विविध उपक्रम, राबवण्यात आले. शहरातील विविध घटकातील नागरिक, संघटना, दिव्यांग बांधव, तृतीयपंथी आदींमध्ये जनजागृती करून शंभर टक्के मतदानाचा संकल्प करणारी शपथ सर्वांना दिली. महानगरपालिकेच्या बस सेवा देणाऱ्या बसेस, बस स्टॉप, कचरा संकलन करणाऱ्या घंटागाड्या आदींवर फलक लावून, जिंगल्स वाजवून मतदारांमध्ये जनजागृती करण्यात आली. मतदारांकडून संकल्पपत्र भरून घेण्यात आले. महानगरपालिकेतील देयके, विविध पावत्यांवर वॉटरमार्क द्वारे मतदार जागृतीचा लोगो छापण्यात आला. सोशल मीडियात अधिकाऱ्यांमार्फत मतदारांना मतदानासाठी आवाहन केले. शाळा व महाविद्यालयांमध्ये विविध उपक्रम, कार्यक्रमांच्या माध्यमातून जनजागृती केली. विविध मॉर्निंग ग्रुप मध्ये चर्चासत्र घडवून आणत वेगळ्या प्रकारे जनजागृती करण्यात आली. तसेच, अहिल्यानगर शहरातील मतदारांमध्ये मतदानाबाबत जागृती व्हावी, त्यांना मतदान केंद्र, यादीतील क्रमांक, खोली आदीची अचूक माहिती मिळावी, अधिकाधिक मतदान व्हावे, यासाठी महानगरपालिकेच्या वतीनेही स्वतंत्रपणे मतदार स्लिप वितरण करण्यात आले.

या उपक्रमांमुळे मतदानाचा टक्का वाढण्यासाठी निश्चित फायदा होणार आहे.



जिल्ह्यातील निकडीच्या प्रश्नांना वाचा फोडणारे एकमेव दैनिक

संस्थापक कै. आचार्य गुंदेचा

# नवा मराठा


फोन-२४१४१४१, २४१७७७७

भाडोत्री म्हणून वर्षानुवर्ष जगण्यापेक्षा निर्भिड म्हणून क्षणभर जगण्यात जीवनाचे खरे सार्थक आहे. - कै.आचार्य गुंदेचा

email - navamaratha@gmail.com

## अर्थ, अध्यात्मतेचा बहुआयामी प्रतिभावंत



पंतप्रधान आर्थिक सल्लागार परिषदेचे अध्यक्ष, सुप्रसिद्ध अर्थतज्ञ, भारतीय संस्कृतीचे अभ्यासक, प्रसारक, चिंतनशील लेखक विवेक देबरॉय यांचे नुकतेच निधन झाले. अत्यंत प्रतिभावंत, अष्टपैलू व नव्या संकल्पना (विशेषतः बौद्धीक) मांडणाऱ्या लेखकांत त्यांचा समावेश होता. निष्णात भाषांतरकार असण्याबरोबरच अध्यात्म, संस्कृती व इतिहासाचा अनोखा संगम साधणारे त्यांचे मौलिक विचार दिशादर्शक होते.

आर्थिक तज्ञ म्हणून त्यांनी तार्किक विश्लेषणाच्या माध्यमातून धोरणांची दिशा निश्चित केली. अर्थ मंत्रालयाच्या 'अमृतकाल' योजनेचा पायाभूत आराखडा तयार करणे व निधी पुरवठा करणाऱ्या तज्ञ समितीचेही ते अध्यक्ष होते. थोडक्यात, देशाला आर्थिक नवदिशा, नवदृष्टीकोन देण्यात त्यांचे मोलाचे योगदान होते.

तारुण्यात लेखक होण्याचे स्वप्न पाहणाऱ्या देबरॉयांनी देशातील आर्थिक विषमता पाहून आर्थिक संशोधन करण्याचे ठरवले व देशाला एक तज्ञ व लोकाभिमुख अर्थतज्ञ मिळाला. त्यांनी चार दशकांच्या काळात क्रीडा सिद्धांत, आर्थिक सिद्धांत, उत्पन्न अन् सामाजिक असमानता, गरिबी, कायद्यातील सुधारणा, रेल्वे सुधारणा आणि भारती विद्या (Indology) क्षेत्रात भरीव योगदान दिले. 'गेटिंग इंडिया बॅक ऑन ट्रॅकर' हे त्यांचे पुस्तक आर्थिक सुधारणासाठीचा महत्त्वाचा ऐवज आहे.

आपल्याला ठाऊक नाही पण भारतीय रेल्वेचा कायापालट होण्यासाठी देबबाबूंचे मोलाचे योगदान होते, आहे. पंतप्रधानांच्या अत्यंत निकटवर्तीय देबरॉय यांचा 'विकसित भारत' संकल्पना राबवण्यात मोठा वाटा होता. येणाऱ्या काळात ५ ट्रिलीयन डॉलरची अर्थव्यवस्था व तिसऱ्या महा आर्थिक सत्ता होतांना त्यांची उणीव भासेल. नव्या पिढीच्या देशप्रेमी व अर्थ जाणू पाहणाऱ्यांनी त्यांची माहिती व पुस्तके अनुभवावी.

# शिवसेना शिंदे गटाचे श्रीरामपूरचे उमेदवार भाऊसाहेब कांबळे यांच्या गाडीवर गोळीबार

**अशोक कारखान्यासमोर बुधवारी पहाटेची घटना, नेम चुकल्याने बालंबाल बचावले**



श्रीरामपूर - श्रीरामपूर विधानसभा मतदारसंघाचे शिवसेना शिंदे गटाचे उमेदवार भाऊसाहेब कांबळे यांच्या गाडीवर तीन अज्ञात व्यक्तींनी गोळीबार केल्याची घटना बुधवारी (दि.२०) पहाटे १.३० च्या सुमारास अशोकनगर येथील अशोक सहकारी साखर कारखान्याच्या गेट समोर घडली. सुदैवाने गोळीबार करणाऱ्याचा नेम चुकल्याने कांबळे हे बालंबाल बचावले आहेत.

याबाबत श्रीरामपूर शहर पोलीस ठाण्यात भाऊसाहेब कांबळे यांनी दिलेल्या फिर्यादीत म्हटले आहे की मंगळवारी (दि.१९) रात्री ११.३० वा सुमारास आपण व डॉ. संजय फरगडे, जनार्धन गालपगारे, असे मातापूर येथे माझे कार्यकर्ते संजय लबडे यांची बोलेरो गाडी (क्र.एम एच १७ सीएम ७१९१) मध्ये ड्रायव्हर चेतन तनपुरे यांचेसह मतदार संघात मतदारांच्या गाठीभेटी घेण्यासाठी गेलो होतो. तेथे पक्षाच्या कार्यकर्त्यांना भेटून आम्ही चौघे बोलेरो गाडीतून रात्री एक वाजताच्या सुमारास श्रीरामपूरकडे निघालो. गाडीमध्ये चालकाच्या शेजारील सिटवर बसलेलो होतो. त्यावेळी प्रवास करत असतांना माझ्या लक्षात आले की, दोन मोटारसायकल आमचा पाठलाग करत आहेत. त्याबाबत मी माझे सोबतचे लोकांना सांगितले.

काही अंतर गेल्यानंतर रस्त्यात अशोक सहकारी साखर कारखाना, अशोकनगरचे मुख्य गेट आले. संरक्षणासाठी कारखान्याच्या गेटमधून गाडी आत घेण्यास मी चालकाला सांगितले. चालकाने गाडी गेटकडे वळविली परंतु त्यावेळी कारखान्याचे गेट अर्धवट बंद होते. त्यामुळे आमची गाडी आत जाऊ शकली नाही म्हणून चालकाने गाडी उभी केली.

त्या दरम्यान पाठलाग करणाऱ्या दोन मोटारसायकल वरील व्यक्तींनी त्यांच्या मोटारसायकल रोडच्या बाजुला उभ्या करुन अंदाजे २० ते २५ वयोगटातल्या तीन व्यक्ती आमच्या उभ्या असलेल्या बोलेरो गाडीच्या समोर चालत आले. त्यामुळे मी चालकाला आमची बोलेरो गाडी मागे घेवुन पुन्हा श्रीरामपुरच्या दिशेने घेण्यास सांगितली. चालक गाडी मागे घेत असताना गाडीच्या समोरील तिघांपैकी एकाने त्याचे कमरेतुन एक पिस्टल काढुन आमच्या गाडीच्या दिशेन एक गोळी फायर केली.

परंतु आमची गाडी वेगात मागे घेतल्याने ती गोळी गाडीला न लागता हवेत गेली. त्यानंतर आम्ही गाडी वेगात चालवुन श्रीरामपुरच्या दिशेने निघालो. श्रीरामपुरमध्ये येवुन आम्ही माझे मित्र प्रकाश चित्ते यांच्या घरी गेलो. त्यानंतर घडले प्रकाराबाबत श्रीरामपुर शहर पोलीस स्टेशनला येवून फिर्याद दिली. या फिर्यादीवरून पोलिसांनी तीन अज्ञात व्यक्तिविरुध्द गुन्हा दाखल केला आहे.

# 'शेअर मार्केट'मध्ये गुंतवणुकीतून ज्यादा परताव्याच्या अमिषाने नगरमध्ये युवकाची ४ लाख रुपयांची फसवणूक

नगर - शेअर मार्केटमध्ये गुंतवणूक केल्यास १० टक्के परतावा देण्याच्या आमिषाने एका युवकाची चार लाख रूपयांची फसवणूक केल्याचा प्रकार समोर आला आहे. प्रेमराज धोंडीभाऊ कुनगर (वय २२, रा. टाकळी लोणार, ता. श्रीगोंदा, हल्ली रा. यशवंत कॉलनी, नगर-सोलापूर रस्ता, ता. नगर) असे फसवणूक झालेल्या युवकाचे नाव आहे.

दरम्यान, कुनगर यांनी येथील अतिरिक्त सत्र न्यायालयात तक्रार दखल केली होती. त्या तक्रारीवरून अतिरिक्त सत्र न्यायाधीश एम. एस. लोणे यांनी या प्रकरणी गुन्हा दाखल करण्याचे आदेश दिले आहेत. त्यानंतर कुनगर यांच्या फिर्यादीवरून सोमवारी (दि.१८) नगर तालुका पोलीस ठाण्यात फसवणूकीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

भूषण दिपेश देशमुख (रा. लक्ष्मी संकुल, भुषण कॉलनी, एमजी कॉलेजच्या पाठीमागे, ता. जि. जळगाव) असे गुन्हा दाखल झालेल्या व्यक्तीचे नाव आहे. सदरची घटना ११ सप्टेंबर २०२२ ते २ डिसेंबर २०२२ दरम्यान घडली आहे. फिर्यादी हे शिक्षण घेतात. ते सप्टेंबर २०२२ ते डिसेंबर २०२२ दरम्यान नगर तालुक्यातील साकत खुर्द व नगर शहरातील अहमदनगर कॉलेजमध्ये असताना त्यांनी संशयित आरोपीकडे शेअर मार्केटसाठी गुंतवणूक केली होती.

त्याने गुंतवणूकीवर १० टक्के परतावा देण्याचे आमिष दाखविण्यात आले होते. फिर्यादी यांनी संशयित आरोपीला युपीआय मार्फत चार लाख रूपये पाठविले होते. दरम्यान, संशयित आरोपीने फिर्यादीला मोबदला न देता त्यांची फसवणूक केली. याविरूध्द फिर्यादीने न्यायालयात तक्रार दाखल केली. तेथे त्यावर सुनावणी होऊन न्यायालयाने गुन्हा दाखल करण्याचे आदेश पोलिसांना दिले. तालुका पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे. अधिक तपास पोलीस अंमलदार लबडे करत आहेत.

# मतदान केंद्रावर मतदारांना समान वागणूक देण्यात यावी

**तर प्रतिष्ठीत आणि उमेदवारांना मतदान केंद्रात फोटो घेण्यास बंदी करावी**

नगर - विधानसभा निवडणुकीसाठी मोठ्या उत्साहात मतदान होत आहे. त्या अनुषंगाने वृत्तवाहिन्यांवर विद्यमान उमेदवार तसेच समाजातील प्रतिष्ठित व्यक्ती मतदान केंद्रामध्ये मतदान करतानाचे छायाचित्र / व्हिडिओ टी.व्ही.वर पहायला मिळत आहेत. मात्र सामान्य मतदारांना मतदान केंद्रावर मोबाईल फोन आणण्यास अथवा कॅमेऱ्याने छायाचित्र घेण्यास बंदी घातली जाते. मतदारांमध्ये हा भेदभाव अयोग्य आहे. सामान्य मतदार अथवा प्रतिष्ठित व्यक्ती अथवा उमेदवार हे सर्वजण समान मतदार असल्याने सर्वांना मतदान केंद्रावर समान वागणूक मिळायला हवी. हल्ली सर्वांकडे मोबाईल असल्याने अनेक युवक-युवतींना मतदान कक्षाजवळ उभे राहुन फोटो घेण्याचा मोह होतो. परंतु सामान्य मतदारांना फोटो काढण्यास बंदी असते. प्रतिष्ठित आणि सामान्य मतदारांमध्ये असाच भेदभाव चालु राहिल्यास येणाऱ्या काळात मतदानाची आकडेवारी आणखी कमी होताना दिसुन येईल. मतदान हे गुप्त रहावे हे सर्वमान्य आहे. परंतु मतदान केंद्रामध्ये सर्व मतदारांना समान वागणुक मिळाल्यास मतदानाची टक्केवारी नक्कीच वाढलेली दिसुन येईल. सामान्य मतदारांना मतदान कक्षाजवळ फोटोला बंदी असल्यास प्रतिष्ठित व्यक्ती आणि उमेदवारांना सुध्दा फोटो आणि व्हिडिओसाठी सक्तीने बंदी घालण्यात यावी, अशी मागणी निनाद हिरवे यांनी मतदान केंद्र प्रमुखाकडे केली आहे.




## मुंबई क्रिकेट एसोसिएशनच्या अंडर १९ टीम ला देण्यात आले ध्यानधारणेचे धडे

कांदिवली येथील एमसीए सचिन तेंडुलकर जिमखान्यामध्ये प्रजापिता ब्रह्मा कुमारी ईश्वरीय विश्व विद्यालयाच्या वतीने मुंबई क्रिकेट एसोसिएशन च्या अंडर १९ टीम ला ध्यानधारणेचे धडे देण्यात आले. खेळाडूंची एकाग्रता व मनोबल वाढवण्यासाठी या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमात मोटिवेशनल स्पीकर बी के डॉ. दीपक हरके व मोटिवेशनल स्पीकर बी के श्रेया यांनी खेळाडूंना मार्गदर्शन केले. या वेळी संघाचे प्रशिक्षक द्रोणाचार्य पुरस्कार विजेते दिनेश लाड व संघाचा कर्णधार प्रतीक यादव यांच्यासह सर्व खेळाडू सहभागी झाले होते.



बोल्हेगावच्या चिंतामणी कॉलनीतील नाजूक व्यवसाय बंद करावा या मागणीचे निवेदन पोलिस अधीक्षकांना देण्यासाठी आलेल्या महिला.

# बोल्हेगावच्या त्या कॉलनीतील 'नाजूक व्यवसाय' बंद करा

## परिसरातील नागरिकांची जिल्हा पोलिस अधीक्षकांकडे मागणी

नगर - बोल्हेगाव परिसरातील चिंतामणी कॉलनी येथे गेल्या काही दिवसांपासून राहत्या घरात नाजूक व्यवसाय सुरु आहे. त्यामुळे कॉलनीत राहणे नागरिकांसाठी मुश्किल झाले आहे. कॉलनी सुरु असलेला प्रकार कायमस्वरुपी बंद व्हावा अशी मागणी चिंताणी कॉलनीतील रहिवासी यांनी जिल्हा पोलिस अधीक्षक राकेश ओला यांना दिलेल्या निवेदनात केली आहे.

चिंतामणी कॉलनी येथे एक महिला व एक पुरुष हे अनेक दिवसांपासून राहत्या घरात सेक्स रॅकेट चालवत आहेत. याबाबत त्यांच्यावर एमआयडीसी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल झालेला आहे. त्या दोघांना पोलिसांनी अटक केलेली आहे. कॉलनी सुरु असलेल्या या प्रकारामुळे नारिकांना तेथे राहणे अवघड झाले आहे. रात्री अपरात्री कॉलनीत धिंगाणा सुरु असतो. त्यामुळे महिलांना घराबाहेर पडले अवघड झाले आहे.

त्यामुळे कॉलनीत सुरु असलेला त्यांचा व्यवसाय कायस्वरुपी बंद करण्यात यावा, त्यांच्यावर पोलिस प्रशासनाने कायदेशीर कारवाई करावी अशी मागणी कॉलनीतील गिता कांबळे, पल्लवी कवाने, भारती राऊत, तेजस्विनी दसरे, सुवर्णा होले, गीता खोबरे, मनिषा भुकन, शांताबाई भुकन, वैष्णवी भूकन, निर्मला साठे, कोमल साठे, आशियाना शेख यांच्यासह ३०-३५ महिलांनी केली आहे. पोलिस प्रशासनाने चिंतामणी कॉलनीतील सदर प्रकार बंद न केल्यास तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा देण्यात आला आहे.

# निवडणूक कर्तव्यावरील शिक्षक, शिक्षकेतरांना दुसऱ्या दिवशी २१ नोव्हेंबरला सुट्टी जाहीर करा

**सलग दोन दिवस-रात्र सेवा देणाऱ्या शिक्षक, शिक्षकेतरांचा विचार व्हावा**



निवडणुक कर्तव्यावरील शिक्षक, शिक्षकेतरांना दुसऱ्या दिवशी सुट्टी जाहीर करावी, या मागणीचे निवेदन निवासी उपजिल्हाधिकारी राजेंद्रकुमार पाटील यांना देण्यात आले.

नगर - निवडणुकीसाठी सेवा अधिग्रहित केलेले शिक्षक, शिक्षकेतर दिवस-रात्र कर्तव्य बजावून थकलेले असताना लगेच दुसऱ्या दिवशी शाळेवर हजर होणे अशक्य आहे. निवडणुकीत कर्तव्यावर असलेल्या शिक्षक, शिक्षकेतरांना दुसऱ्या दिवशी गुरुवारी (दि.२१ नोव्हेंबरला) सुट्टी घोषित करण्याची मागणी महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषदेच्या वतीने करण्यात आली आहे. या मागणीसाठी शिक्षक परिषदेच्या शिष्टमंडळाने निवासी उपजिल्हाधिकारी राजेंद्रकुमार पाटील व जि.प. माध्यमिकचे शिक्षणाधिकारी अशोक कडूस यांना निवेदन दिले.

यावेळी शिक्षक परिषदेचे जिल्हाध्यक्ष बाबासाहेब बोडखे, सचिव शिवाजी घाडगे, प्रा. अमोल क्षीरसागर, गणेश शिंदे, रमेश बाबंळे आदी उपस्थित होते.

महाराष्ट्रासह जिल्ह्यात २० नोव्हेंबर रोजी विधानसभा निवडणूक निर्विघ्नपणे पार पाडावी यासाठी मोठ्या संख्येने शिक्षक, कर्मचाऱ्यांचा सेवा अधिग्रहित करण्यात आले आहेत. निवडणुकीच्या कामाकरिता सेवा अधिग्रहित केलेल्या शिक्षक कर्मचाऱ्यांनी मंगळवारी (दि.१९ नोव्हेंबर) रोजी सकाळी ८ वाजता निवडणूक साहित्य स्विकारुन मतदान केंद्रावर गेलेले आहेत. निवडणुकीचे साहित्य प्राप्त झाल्यानंतर मतदान केंद्रावर जाणे, साहित्यांची योग्य मांडणी करणे व मतदान प्रक्रियेची व्यवस्था करण्याची जबाबदारी त्यांच्यावर असते. बुधवारी (दि.२० नोव्हेंबर) प्रत्यक्ष पहाटे पासून निवडणूक प्रक्रिया सुरू करून प्रत्यक्ष मतदान सकाळी ७ वाजता सुरू करणे व संध्याकाळी सहा वाजेपर्यंत अखंडपणे मतदान प्रक्रिया सुरू ठेवण्याचे कर्तव्य ते पार पाडत असतात.

त्यानंतर आदेशानुसार कार्यपूर्तता करून संपूर्ण साहित्य संकलन केंद्रावर जमा करणे इत्यादी अत्यंत महत्त्वपूर्ण कामे शिक्षक कर्मचाऱ्यांना करावी लागतात. सलग दोन दिवस त्यांनी दिवस-रात्र सेवा द्यावी लागते. या कामानंतर लगेच दुसऱ्या दिवशी शाळेवर हजर होणे शक्य होत नाही. यासाठी प्रशासनाने निवडणुकीसाठी सेवा अधिग्रहित केलेले शिक्षक, शिक्षकेतरांना गुरुवारी सुट्टी जाहीर करण्याची मागणी शिक्षक परिषदेने केली आहे.

निवडणुकीच्या कर्तव्यावर सलग दोन दिवस-रात्र सेवा देणारे शिक्षक, शिक्षकेतर मानसिक व शारीरिकपणे पूर्णत: थकून जातात. त्यांना लगेच निवडणुकीचे काम संपवून दुसऱ्या दिवशी शाळेत हजर होण्यास लावणे हे अत्यंत गैरसोयीचा व यातना देणारा प्रकार आहे. प्रामाणिकपणे निवडणुकीत सेवा देणाऱ्या शिक्षक, शिक्षकेतरांना मतदान साहित्य जमा करुन घरी जाण्यास पहाट होते व पुन्हा सकाळी शाळेवर जाणे अशक्य ठरते. अशा परिस्थितीमध्ये त्यांच्या कामाचा विचार करुन त्यांना दुसऱ्या दिवशी सुट्टी देणे गरजेचे आहे, असे बाबासाहेब बोडखे यांनी म्हटले आहे.

## राकेश धेंड यांचे आकस्मिक निधन



नगर - येथील चित्रा टॉकीज मागे चितळे रोड येथील रहिवासी राकेश कैलास धेंड (वय ३३) यांचे १८ नोव्हेंबर रोजी आकस्मिक निधन झाले. त्यांच्यावर १९ नोव्हेंबर रोजी नालेगाव, अमरधाममध्ये अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्या मागे आई, १ भाऊ, १ बहिण, २ चुलते, चुलत्या, चुलत भाऊ असा परिवार आहे. रोहित कैलास धेंड यांचे ते धाकटे बंधू होत.

## सौ. रजनी शेजुळ यांचे निधन



नगर - सेलटॅक्स कॉलनी सावेडी मधील रहिवासी सौ. रजनी अशोक शेजुळ (वय ६४) यांचे १९ नोव्हेंबर रोजी निधन झाले. त्याचेमागे पती, दोन मुले, सुना, नातवंडे असा परिवार आहे.

त्या सेवानिवृत्त विक्रीकर अधिकारी अशोक छगनराव शेजुळ यांच्या पत्नी तर पवन, गणेश यांच्या आई होत. त्याचेवर नालेगाव अमरधाम येथे मंगळवारी अंत्यसंस्कार करण्यात आले.




## केडगावमध्ये मतदानासाठी मतदान केंद्राबाहेर लागल्या रांगा...

विधानसभा निवडणुकीसाठी केडगाव येथील मतदान केंद्रावर मतदारांची मोठी गर्दी झाली होती. (छाया - अमित मन्यार)

# गृहिणी

## आरोग्य

### गर्भवतीसाठी गुणकारी दुधी भोपळा

दुधी भोपळा हा धातुपुष्टीकर असल्या कारणाने गर्भवती स्त्रीने आहारामध्ये दुधीचे सेवन नियमित करावे. यामुळे गर्भवतीचे आरोग्य चांगले राहून गर्भाचे पोषणही व्यवस्थित होते. तसेच गर्भावस्थेमध्ये वारंवार होणारा मलावष्टंभाचा त्रासही दूर होतो. उष्णतेमुळे शरीराची लाहीलाही होत असेल तर दुधीचा रस खडीसाखर घालून प्यावा. यामुळे उष्णतेचा त्रास कमी होतो. त्याचप्रमाणे गर्भाचे पोषणही चांगले होते.

## पाककला

### गोड दलिया

**साहित्य :** चार वाट्या दलिया, दोन नारळ, तीन वाट्या गुळ, दोन मोठे चमचे साजूक तूप, अर्धा चमचा मीठ, दहा-बारा लवंगा, एक मोठा चमचा वेलची पूड, दहा-बारा पेढे, काजू-बदाम काप, बेदाणे मिळून एक वाटी, अर्धी वाटी दूध.

**कृती :** दलिया दुप्पट पाणी आणि मीठ घालून कुकरमध्ये शिजवून घ्यावा. नारळ खवून घ्यावा. तूप तापवून त्यात लवंगा टाकाव्या. त्या तडतडल्या की गूळ घालावा. खोबरं आणि पेढे घालावे. गूळ विरघळला की मोकळा केलेला दलिया घालावा. दूध घालून, ढवळून एक-दोन वाफा द्याव्या. वेलची पूड घालावी. सुकामेवा घालावा.

## सौंदर्य

### तजेलदार त्वचेसाठी

मुलतानी माती, गुलाबपाणी, चंदन पावडर एकत्र करून त्याचा लेप त्वचेवर लावावा. थंड पाण्याने धुवावा. त्वचा तजेलदार होते.

## सल्ला

भिजलेले कडधान्य मोड येण्यासाठी प्लॅस्टीकच्या पिशवीत किंवा सुती कापड्यात बांधल्यास चांगले मोड येतात.

## वास्तू

✻ रोज जेवणापूर्वी वास्तू पुरुषासाठी वेगळा नैवेद्य आठवणीने दाखवावा.

✻ घरात जास्तीत जास्त शांतता ठेवण्याचा प्रयत्न करावा. तसेच घर आणि घराचा परिसर स्वच्छ व नीटनेटका ठेवावा.

✻ घरात इन्व्हर्टर, जनरेटर वा विजेचे मेन कनेक्शन आग्नेय वा वायव्य कोपऱ्यात असावे.

✻ कापलेली भाजी कधीही थेट जमिनीवर ठेवू नये. ✻ मळलेल्या कपड्यांत धुतलेले कपडे मिसळू नयेत.

**संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा**

# दैनिक पंचांग

गुरुवार, दि. २१ नोव्हेंबर २०२४

**गुरुपुष्यामृत, शके १९४६ क्रोधीनामसंवत्सर, कार्तिक कृष्णपक्ष, पुष्य १५।३६, सूर्योदय ०६ वा. २९ मि. सूर्यास्त ०६ वा. २९ मि.**

## राशिभविष्य

**मेष :** दिवस चांगला जाईल. महत्त्वाच्या कार्यात हितचिंतकांकडून मदत मिळेल. वाहन चिंता सतावेल.

**वृषभ :** कलाक्षेत्रातील व्यक्तींच्या कामात स्थिती सुखद राहील. नवीन करार होतील. आरोग्य उत्तम राहील.

**मिथुन :** व्यावसायिक अडचणी सतावतील. वैवाहिक सुख वाढेल. आरोग्याच्या दृष्टीने काळ अनुकूल आहे.

**कर्क :** कौटुंबिक विषयांमध्ये वेळ अनुकूल राहील. वैवाहिक जीवनात वातावरण मधुर राहील. मानसन्मानात वाढ होईल.

**सिंह :** धार्मिक भावना वाढेल. सामाजिक कार्यांमध्ये अनुकूल सहयोग मिळेल व सन्मान वाढेल. वडीलधाऱ्यांचा आदर करावा.

**कन्या :** राजकीय व्यक्तींसाठी स्थिती संतोषदायक राहील. भातृचिंता सतावेल.

**तूळ :** पितृचिंता सतावेल. न्यायसंबंधी विषयांमध्ये यश मिळेल.

**वृश्चिक :** आपल्या क्रोधावर संयम ठेवा आणि सहकार्यांबरोबर वादाची स्थिती टाळा. कौटुंबिक वातावरण अत्यंत उत्तम राहिल.

**धनु :** पूर्वीपासून आपल्या मनातील असलेले संकल्प पूर्ण होतील. पुर्वी केलेल्या श्रमांचे फळ आज मिळेल.

**मकर :** आपण आपल्या घरासाठी मोठी खरेदी करू शकता. कार्य योग्य वेळी पूर्ण करण्यासाठी कठोर श्रम करावे लागतील.

**कुंभ :** आपला विधायक दृष्टीकोन इतरांबरोबर समन्वय साधण्यात मदत करतो.

**मीन :** आपण आपल्या घरासाठी मोठी खरेदी करू शकता. राजकीय व्यक्तींसाठी स्थिती संतोषदायक राहील.

**संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा**

## हसा आणि शतायुषी व्हा!

एक दरोडेखोर आपल्या पत्नीला म्हणाला,
'तुरुंगात रहाण्याचा एकमेव फायदा कोणता माहीत आहे?'
'नाही बाई!... मी कुठे तुरुंगात गेले आहे?'
'तिथे कुणी अर्ध्या रात्री उठवून 'जरा मागच्या दाराला कडी घातली आहे का ते बघून या पाहू' असं म्हणत नाही.'

## ...वाढवूया आपले सामान्य ज्ञान

✻ 'डोळ्यावर कातडे ओढणे' वाक्प्रचाराचा अर्थ काय? - कानाडोळा करणे
✻ 'ते लवकर उठतात' काळ ओळखा? - रिती वर्तमानकाळ
✻ महाराष्ट्र पोलिस खात्यातून कोणते मासिक प्रसिद्ध केले जाते? - दक्षता
✻ मिहान प्रकल्प कोणत्या जिल्ह्यात आहे? - नागपूर

**- अरविंद ब्राम्हणे,** भिंगार मो. ९४०३७३४२८१

## शब्दगंध क्र. ७०५४ सौ.शैलजा कुलकर्णी

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | | ४ | ■ | ५ | ६ |
| ७ | | | ■ | ८ | | | |
| | ■ | ९ | १० | | ■ | | ■ |
| ११ | १२ | ■ | | ■ | १३ | | ■ |
| १४ | | १५ | ■ | १६ | | ■ | १७ |
| ■ | १८ | | ■ | | ■ | १९ | |
| २० | | ■ | २१ | | ■ | ■ | |
| २२ | | ■ | २३ | | | | |

**आडवे शब्द :-** १) आवश्यक नसलेले ५) दिवस; वासर; दीस ७) पती; धनी; मालक; स्वामी ८) जंगलातील वास्तव्य; अरण्यात रहाणे ९) ओझे वाहणारा पूर्वीचा एक गावकामगार ११) धरती; वसुधा; पृथ्वी १३) हेतू; योजना १४) एक चर्मवाद्य १६) मूल्य; किंमत १८) तीन गुणांपैकी एक; धूळ १९) पिता; जनक; तात २०) अयोध्येचा राजा; सीतापती २१) नेहमी; हमेशा २२) मृत पतीच्या देहाबरोबर स्वतःचे दहन करून घेणारी; पार्वती; पतिव्रता २३) मदत करणारा; सहायक

**उभे शब्द :-** १) सतत; अविरत २) वस्तुमात्राचे संबोधन; होडी; जहाज; नाम ३) लग्नानंतर निघणारी वधुवराची मिरवणूक ४) खाण्यासाठी घेतलेला खाद्यपदार्थाचा गोळा; घास ५) एक पक्षी; घुबड ६) धमनी; रक्तवाहिनी; शीर १०) राजाची बायको; क्वीन १२) गुजरातमधील एक नदी १३) याचे पान शंकराला वाहतात १५) लज्जा; शरम; हया १६) गणती; मोजणी १७) एक लिंबूवर्गीय फळ २०) ढीग; चळत; चवड २१) सारखा; समान

### शब्दगंध क्र. ७०५३ चे उत्तर

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| सा | यं | का | ळ | ■ | अं | ब | र |
| म | दा | र | ■ | व | ■ | क | स |
| ना | ■ | खा | ने | सु | मा | री | ■ |
| ■ | ना | ना | ■ | धा | क | ■ | आ |
| म | ना | ■ | मो | ■ | ड | बो | ले |
| ■ | सा | व | का | र | ■ | र | ■ |
| मा | हे | र | ■ | वा | ■ | मा | ज |
| रा | ब | ■ | ■ | ना | र | ळ | ■ |

# ✻ ✻ ✻ ✻ ✻ ✻ मुलांचे विश्व ✻ ✻ ✻ ✻ ✻ ✻

: संकलक : ॲड.सौ. पूजा गुंदेचा

**सुविचार** - मृत्यू हा माणसाला निसर्गाने दिलेला शाप आहे, तर प्रीती हा उःशाप आहे.

## मुलांसाठी मेडिकल जनरल नॉलेज

### कुत्रा चावल्यास माणूस पिसाळतो, हे खरे आहे काय?

कुत्रा चावल्यास माणसाला जखम होते. ती जखम इतर जखमांप्रमाणेच औषधोपचाराने चार-पाच दिवसांत बरी होते. कुत्रा चावल्यास माणूस पिसाळतो, हा समज चुकीचा आहे. मात्र आपल्याला चावलेला कुत्रा जर पिसाळलेला असेल, (म्हणजे त्याला रेबीज वा पिसाळी हा रोग झालेला असेल) तर मात्र आपल्याला धोका असतो.

पिसाळी हा रोग सामान्यपणे कुत्रा, मांजर, कोल्हा, लांडगा अशा मांसभक्षक प्राण्यांना होतो. जंगलातील प्राण्यांना झालेला रोग ते मानवी वस्त्यांतील पाळीव प्राण्यांपर्यंत पोचवतात. नंतर कुत्रा वा मांजर असे पाळीव प्राणी आपल्याला चावल्याने हा रोग आपल्यालाही होतो. म्हणजे हा प्राण्यांचा आजार चुकून वा अपघाताने आपल्याला होतो.

पिसाळी हा रोग ऱ्हॅब्डोव्हायरस या विषाणूमुळे होतो. दंशाच्या जागेपासून हे विषाणू प्रथम स्नायूपेशींमध्ये वाढतात व नंतर चेतातंतूंमधून मेंदूपर्यंत पोचतात. नंतर हे विषाणू शरीरभर पसरतात. लाळेतही हे जंतू येतात. लाळेत हे विषाणू असले तर असा प्राणी मानवाला चावल्यास मानवात पिसाळी हा रोग होऊ शकतो. येथे हे लक्षात ठेवणे आवश्यक आहे की, पिसाळी रोग झालेला कुत्रा वा मांजर, विषाणू त्याच्या शरीरात शिरल्यापासून फक्त दहा दिवसच जिवंत राहू शकतात. त्यामुळे आपल्याला चावलेला कुत्रा चावल्याच्या दिवसापासून दहा दिवसांनंतर जिवंत राहिला, तर तो पिसाळलेला नव्हता हे सिद्ध होते व त्यामुळे आपल्यालाही रोग होण्याची भीती नसते.

पिसाळलेला कुत्रा चावल्यास, त्याची लाळ जखमेला लागल्यास किंवा पिसाळलेल्या म्हशीचे दूध न उकळता पिल्यास आपल्याला पिसाळी रोग होण्याची शक्यता असते. विषाणू दंशाच्या ठिकाणापासून हळूहळू मेंदूपर्यंत पोचतात. यात मेंदूच्या पेशी अतिशय जास्त प्रमाणात उत्तेजित होतात. त्यामुळे आवाज, हवेची झुळूक अशा साध्या उत्तेजनांनीही व्यक्तीला झटके येतात. खूप घाम येतो, लाळ सुटते, डोळ्यांतून खूप पाणी येते, व्यक्ती चिडचिडी होते, पटकन चिडते. मानेचे व घशाचे स्नायू आखडल्यामुळे व्यक्तीला पाणी वा पातळ पदार्थ पिता येत नाहीत. पाण्याच्या नुसत्या आवाजानेही झटके येतात.

म्हणून या रोगाला हायड्रोफोबिया (पाण्याची भीती वाटणारा रोग) असे म्हणतात. हा रोग माणसाला हमखास मारतो. आजवर जगात केवळ ३ रुग्ण वाचू शकले आहेत. या रोगात वर सांगितलेल्या कारणांमुळे माणूस कासावीस होतो, वेडापिसा होतो, पिसाळल्यासारखे करतो; पण एक लक्षात ठेवा, सर्व कुत्रे पिसाळलेले नसतात. चांगले कुत्रे चावल्यास काहीही धोका नसतो व पिसाळलेले कुत्रे चावल्यानंतरही रोगप्रतिबंधक लस घेतल्यास रोग टाळता येतो व आपण सुरक्षित राहू शकतो.

## अडचणीतून मार्ग

राजा विक्रमसेन राज्यातल्या ब्राह्मणांना दान देणार असतो. त्यासाठी ब्रह्मदत्त आणि देवदत्त हे दोघे ब्राह्मण चालत चालत राजधानीकडे निघालेले असतात. दुसऱ्या दिवशी त्यांना राजधानीत पोहोचायचे असते. प्रवासात संध्याकाळ होते. तोपर्यंत ते एका डोंगरापाशी येतात, रात्र झाल्यामुळे अंधार चांगलाच पडलेला असतो. त्यामुळे ते कंदील पेटवतात. पण कंदीलाच्या त्या मिणमिणत्या प्रकाशात त्यांना लांबचे काहीच दिसत नाही. त्यामुळे देवदत्त म्हणतो,

''मी आता यापुढे डोंगर चढणार नाही. कारण मला पुढचे काहीच दिसत नाही. सकाळी उजाडल्यावर पुढचा प्रवास करू. तो एका मोठ्या झाडाखाली अंथरूण पसरून गाढ झोपी जातो; परंतु ब्रह्मदत्त उत्साही असतो, तो मनाशी विचार करतो,

''पुढचा डोंगर दिसला नाही तरी कंदीलाच्या प्रकाशात चालण्यापुरता रस्ता पायाखाली दिसतो आहे. तेव्हा एकेक पाऊल टाकत पुढे जाण्यासाठी तेव्हा प्रकाश पुरेसा आहे.

या विचाराने कंदील उचलून त्याच्या प्रकाशात तो चालायला लागतो. पहाटे-पहाटे तो राजधानीत पोहोचतो. पहिला याचक दाराशी आला म्हणून राजा त्याला भरभरून दानदक्षिणा देतो. दिवसभर ब्राह्मण येऊन दरबारातून दानदक्षिणा घेऊन जात असतात. संध्याकाळी राजा दानकर्म आटोपून आपल्या महालात निघून जातो. त्यानंतर देवदत्त तिथे पोहोचतो. पण वेळ निघून गेलेली असते.

**तात्पर्य :** अडचणीचा विचार करत बसले तर काहीच घडत नाही. त्यामुळे नेहमी अडचणीतून मार्ग काढायला हवा.

## जीवन चक्र - मृत्यू रहस्य (जीवन की रोशनी)



### जीवन की रोशनी

पिता-पुत्र और पवित्र आत्मा त्रैमूर्ति का सिद्धान्त यही है। जहाँ संसार के सारे दर्शन शास्त्रों की सीमा समाप्त होती है वहाँ से सच्चा धर्म आरंभ होता है। इसके आस पास जीवन की सदैव बदल रही फिल्म बनती रहने के पश्चात इस शरीर में रहने वाली आत्मा शरीर, मन और बुद्धि के बने मानव तन रूपी मलमूत्र की इस देही को उतारने के बाद अपने सादा, अखण्ड, महान अमर वृक्ष अर्थात् अपने तत्व रूप या निज रूप में सदा हरी भरी और ताजा दम रहती है और बहुरंगी शीशों के बने हुए जादूमयी गृह को तोड़कर और ब्रह्मांड के तीन सतह वाले अण्डे में से निकल कर पार जा सकती है। फोईनिक्स पक्षी की तरह, जो अपने पहले शरीर की राख में से जन्म लेकर नया यौवन और शक्ति से उड़ जाता है, इस आत्मा को भी आत्मा का जन्म जीने के लिए दोबारा, आत्म रूप में जन्म लेना पड़ेगा अर्थात् द्विजन्मा बनना पड़ेगा। परा-विद्या की साईंस से अपरिचित लोगों के लिए मानसिक संसार को पार कर सकना आसान नहीं। यह बड़ा मायावी संसार है जहाँ बड़े-

बड़े विद्वान, तपस्वी, महात्मा और ऋषि-मुनि भी पथ भ्रष्ट हो जाते हैं। वे आत्माएँ जो सचमुच ही उसके राज्य में से निकल कर पिता- परमात्मा के घर पहुँचने का यत्न करती हैं, को रोकने के लिए ब्रह्म अपने विशाल ब्रह्माण्ड में क्या कुछ प्रस्तुत नहीं करता। स्थूल, सूक्ष्म या मानसिक मंडलों में हर पग पर वह इन आत्माओं का रास्ता रोकने का यत्न करता है। महान पैगम्बरों, रसूलों या मसीहों सभी ने शैतान, मरा, अहरमन बुरी आत्माओं और उनके एजेंटों के साथ अपने घोर युद्धों का वर्णन किया है । इन्होंने अच्छे या बुरे अनेक ढंगों से सच के यात्रियों का संसारिक राज्यों के लालच देकर और यदि वे फिर भी इन लालचों में नहीं फंसे तो आग, गर्जना, आकाश फाड़ देने वाले भूकम्पों, बादलों की गर्जना और बिजली की चमकों या कुछ और भी कह लो, के विनाश के डर देकर रोकने या जीत लेने के निजी अनुभवों का वर्णन किया है। इस तरह स्थितियों, परीक्षाओं आदि में वह आत्मा स्थिर रह सकती है।

जिसके पास उसका गुरु या मुर्शिद हो क्योंकि गुरु ताकत उस समय शिष्य को अपनी ओर खींच कर अपने में समा लेती है और उसे संगीतमयी-नूर के रास्ते से आगे ले जाती है। ब्रह्म ऐसी हर आत्मा के लिए अपना सब कुछ दाँव पर लगा देता है और तब तक झुकता नहीं जब तक उसे विश्वास नहीं हो जाता कि यह आत्मा अब गुरु के साथ पूरी तरह चिपकी (लिपटी हुई है।

(क्रमशः)

**(कृपाल आश्रम, अहिल्यानगर)**

## अंतरिक बल (भाग - २)

### अंतरीक बल

सदा सोचते रहो रूखे लोगों से अपने को केसे बचाए ताकि आप का कीमती समय नष्ट ना हो। समय प्रबन्धन और १०% का नियम

अपने को सर्व गुण संपन्न और १६ कला संपूर्ण बनानें के लिये अपने समय पर १०% का नियम लागू करो। आप को सिर्फ १०% समय लगाना है बाकी ९०% कार्य अपने आप हो जाएगा। अपने दिमाग को विकसित करने के लिये अपने हर घंटे का १०% समय अपने को दें। हर घंटे में ५ मिनिट ध्यान का अभ्यास करो अगर ध्यान नहीं लगाना आता या नहीं लगता तो ५ मिनिट स्वप्रेरित पुस्तकें पढो । सेहत है तो जहान है। इसलिये १०% समय स्वास्थ्य पत्रिका पढ़ने पढ़ा करो चाहे आप कितनी भी महान दीदी है या वरिष्ट भाई है। नहीं में भी हर रोज लगाना । १०% समय का मतलब है कम से कम ५ तो पतन हावी हो जायेगा। अपने को तंदरुस्त रखने के लिये ५ मिनिट मिनिट एक दिन में। अगर हो सके तो हर घंटे ५ मिनिट १०% समय अर्थात १०% समय सैर करने के लिये स्वयं को दान देवें। अगर आप अपनी लौकिक शिक्षा अर्थात डिग्री लेने में लगाओ। अगर आप की उम्र ज्यादा हो गई है और लौकिक सर्विस से रिटायर हो चुके हैं तब भी कम्पीटीशन सक्सेस रिवयू जैसी पत्रिका ५ मिनिट जरूर पढें । इस से एक तो आप जेनरेशन गैप से बचे रहेंगे। दूसरा अगले जन्म आप आई.ए.एस. जैसी परीक्षायें आसानी से पास कर सकेंगे।

सभी समस्याओं का मूल कारण है व्यवहार की कमी। कम से कम १० मिनिट प्रतिदिन अर्थात १०% समय व्यवहार कला की पुस्तकें पढ़ने पर दो। धनवान बनने के लिये १०% समय इस विषय पर पुस्तकें पढ़ने पर खर्च करें। ये पुस्तकें हमें बदलते समय के साथ धनी बने रहने के अच्छे अच्छे सुझाव देती रहती है।

१०% अधिक समय आत्मा, परमात्मा के विषय पढ़ने के लिये हर रोज लगाना है। कड़े संस्कारों को बदलने के लिये १०% समय अधिक ध्यान साधना में लगाये या कड़े संस्कार पर पुस्तकें पढ़े। जो पुस्तकें आज तक आप नहीं पढ़ सके उन पुस्तकों को पढ़ने के लिये ५ मिनिट अर्थात १०% समय स्वयं को दान में दो। लोगों के साथ टकराव से बचने लिये १०% समय कल्याण कार्यों में ज्यादा लगायें। जिन लोगों से टकराव होता है उनके सामने जाने से पहले बाबा को याद करो या मनोबल को बढ़ाने वाली कोई पुस्तक पढ़ कर जाओ। आमतौर पर व्यक्ति दूसरों को समझाने में व्यस्त रहते की आयु ४० वर्ष हो गई है तो सैर को गुरूद्वारे का प्रसाद या क्लास की मुरली समझ कर जरूर करो नहीं तो शरीर आप को बैक गेयर लगा देगा। हमारा ऊपर जाने का प्रोग्राम जल्दी बन जायेगा और यह संसार ऐसे ही चलता रहेगा जिसकी चिंता में हम सेहत गंवा बैठे। १०% समय महापुरुषों की जीवनी पढ़ने में लगाये ताकि आप बुद्धिवान और दुनिया के लिये आदर्श बन सकें।

(क्रमशः)

**(प्रजापिता ब्रम्हाकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय)**

## आयुर्वेदिक गर्भसंस्कार

### गर्भावस्थेतील तपासण्या व लसीकरण

मला खूप भीती वाटते. अशा वेळी गर्भवतींना मानसिक आधार द्यावा लागतो. आताच्या काळात टी.व्ही.वरील भरपूर चॅनेल्सवरील मालिका, बीभत्स जाहिराती, मालिकांमधून दाखविणारे कौटुंबिक कलह, चोऱ्या, खून, दरोडे यांचे चित्रीकरण, अशा प्रकारचे पेपरमधील वाचन, वर्तमानपत्रातील बीभत्स जाहिराती, कंडोमच्या बिभत्स जाहिराती, अश्लील सी.डी. यांचा गर्भस्थ बालकावर वाईट परिणाम होतो, कारण आपण जे काही वाचतो, ऐकतो, बोलतो ते सर्व काही बाळाचे इंद्रिय विकसित झाल्यावर बाळाला समजते व याचे दुष्परिणाम बाळाच्या शरीरावर व मनावर होतात.

पूर्वीची शिक्षणपद्धती अवघड नव्हती. त्या काळात स्पर्धा देखील कमी होती. आजच्या धावपळीच्या, धकाधकीच्या काळात सर्वांचाच मानसिक ताण वाढलेला आहे; त्यामुळे आताच्या प्रचंड वाढत चाललेल्या स्पर्धेत बाळाची शारीरिक वाढ व मानसिक बुध्यांक वाढलेला असणे जरुरीचे आहे. गर्भसंस्कारातून कुठल्याही प्रकारचा तोटा न होता भावी मातेचा व बाळाचा फायदाच आहे.

आजच्या युगातील स्त्रियांना नोकरीनिमित्त बाहेर पडावे लागते. घरातील सर्व कामे आटोपून ज्येष्ठ सदस्यांची जबाबदारी पार पाडताना, नोकरीसाठी बाहेर जाताना घर आणि नोकरी या दोन्ही जबाबदाऱ्या पार पाडताना तिचे शारीरिक व मानसिक खच्चीकरण होते. अशा अवस्थेत ॐकार. प्राणायाम, ध्यान-धारणा, आवडते संगीत, बाळाशी संवाद या गोष्टींमुळे भावी मातेचे मन निश्चितच आनंदी राहते व तिची विचारसरणी सकारात्मक बनते. संशोधनाद्वारे सिद्ध झाले आहे. की, सकारात्मक विचारामुळे आपल्या आजूबाजूला सकारात्मक वलय तयार होते व त्याचा मातेला निश्चितच फायदा होतो.

कारण या सकारात्मक वलयातूनच मातेला सकारात्मक ऊर्जा मिळत असते. उदा. देव आपल्याला प्रत्यक्ष दिसत नाही; परंतु तरीसुद्धा आपण त्यावर श्रद्धा ठेवून त्याची पूजाअर्चा करतो व त्यातून आपण मन:शांती मिळवितो. भविष्यात काही संकट आले की, माझ्या पाठीशी देव आहे असे म्हणतो यातून एक प्रकारे अध्यात्मिक भक्तीने आपण सकारात्मक ऊर्जा मिळवित असतो. आपल्या आजूबाजूला वातावरणामध्ये ऑक्सिजन भरपूर प्रमाणात असतो. नकळतपणे आपण श्वास घेतो, सोडतो, ऑक्सिजन घेण्याची क्रिया श्वास घेताना आपोआप घडत असते. ऑक्सिजन आपल्याला दिसत नाही; परंतु एखाद्या आत्यायिक अवस्थेतील रुणाचे जीवन ऑक्सिजनवर अवलंबून असते. अशा वेळी आपल्याला ऑक्सिजनचे महत्त्व समजते. प्रत्यक्ष दिसत नाही; परंतु त्यांचे अनमोल असे महत्त्व समजले.

**(क्रमशः)**

**डॉ. शारदा निर्मळ-महांडुळे**
दुर्वांकुर वंध्यत्व निवारण व गर्भसंस्कार सेंटर
अहिल्यानगर मोबाईल नं- ८७९३४००४००

# गीता अंतकरणात राष्ट्रभक्ती रुजविते

**स्वामी प्रत्ययानंद यांचे प्रतिपादन; अहिल्यानगरला गीता पाठांतर स्पर्धा**

नगर – भारतीय आणि हिंदू हीच आपली पहिली ओळख आहे. वसुधैव कुटुंबकम अशी आपली संस्कृती आहे. त्यामुळे बालपणापासूनच शाळेत गीता शिकवली पाहिजे तरच आपल्या अंतकरणात प्रेम, राष्ट्रभक्ती व सुसंस्कृतपणा रुजेल, चांगले यशस्वी जीवन कसे जगावे हे गीता शिकविते गीता ही अंतकरणात राष्ट्रभक्ती रुजविते, असे प्रतिपादन चिन्मय मिशनचे नांदेड व अहिल्यानगरचे प्रमुख स्वामी प्रत्ययानंद सरस्वती यांनी केले

अहिल्यानगर येथील पाईपलाईन रोडवरील श्रीकृष्णनगर येथे चिन्मय मिशनच्या वतीने गुरुदेव स्वामी चिन्मयानंद यांच्या १०८ व्या जयंतीनिमित्त श्रीमद् भगवत गीता पाठांतर स्पर्धा जिल्हा पातळी स्तरावर आयोजित करण्यात आली होती. यामध्ये वसंत टेकडी येथील डॉ. ना. ज. पाऊलबुधे, सावेडी येथील श्री समर्थ विद्या मंदिर, श्रीराम चौक येथील चिन्मय बाल संस्कार वर्ग, डोंगरगण येथील ज्ञानेश आश्रम पारनेर येथील कर्जुले हरियाचे हरेश्वर विद्यालय अशा शाळांमधील ५२ विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला होता. या विजयी स्पर्धकांना स्वामींच्या हस्ते प्रशस्तीपत्रक, भेटवस्तू, बक्षिसे देऊन गौरविण्यात आले. याप्रसंगी चिन्मयनगर शाखेचे अध्यक्ष दौलत घोरपडे, सचिव देवराम मोरे, खजिनदार उत्तम साळुंखे, शिवाजी ढोले, विजय दळवी, खंडेराव मगर, भाऊसाहेब निमसे, सेवानिवृत्त इंजिनियर श्री. घनदाट, श्रीमती विद्याताई हारदे, श्रीमती सुशीलाताई वाघ, श्रीमती मंगल अष्टेकर परिसरातील नागरिक उपस्थित होते.



अहिल्यानगर येथील पाईपलाईन रोडवर श्रीकृष्णनगर येथे गीता पाठांतर स्पर्धा पार पडल्या यावेळी विजयी स्पर्धकांना स्वामी प्रत्ययानंद सरस्वती यांच्या हस्ते प्रशस्तीपत्र, भेटवस्तू देऊन गौरवण्यात आले. यावेळी सचिव देवराम मोरे आदी. (छाया– विजय मते)

प्रास्ताविकात उत्तम साळुंखे यांनी चिन्मय मिशनच्या कार्याची माहिती दिली ते म्हणाले जगभरातील सुमारे ३५० शाखांच्या माध्यमातून विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात येते. सर्व शाखांमधून भगवत गीता ज्ञानयज्ञ मार्फत गीतेचा प्रचार, प्रसाराचे प्रमुख कार्य केले जाते. उपनिषदे व इतर धार्मिक, अध्यात्मिक ग्रंथांचे पाठ घेतले जातात. आज झालेल्या पाठांतर स्पर्धेसाठी गीतेमधील कर्मसंन्यास योग या ५व्याअध्यायाची निवड करण्यात आली होती. इयत्तेनुसार सहा गटांमध्ये परीक्षा घेण्यात आली होती. यामधून विजयी स्पर्धक निवडले. शाळेमध्ये देखील गीता पाठ झाले पाहिजे अशी अपेक्षा साळुंखे यांनी व्यक्त केली. कार्यक्रमाचा समारोप सर्व विद्यार्थ्यांना अल्पोपहार देऊन करण्यात आला. शेवटी सचिव देवराव मोरे यांनी सर्वांचे आभार मानले.

## स्टॅमिना स्पोर्टस् ॲकॅडमीचे बेल्ट परिक्षेत यश

नगर – शहरातील स्टॅमिना स्पोर्टस् ॲकॅडमीचा बेल्ट वितरण समारंभ झाला. यावेळी खेळाडू विविध कलर बेल्ट परिक्षेत उत्तीर्ण झालेले विजेते विद्यार्थी/खेळाडू – शाहनवाज कुरेशी, आहिल सलिम, ओवेस इरफान, कु. उम्मे कुलसूम वसीम.

या अकॅडमीचे खेळाडू आजपर्यंत राज्य आणि राष्ट्रीय स्पर्धेत चमकले आहेत. आणि पोलिस भरती आणि सैन्य भरती मध्ये निवड झालेली आहेत.



स्टॅमिना स्पोर्टस् ॲकॅडमीचे बेल्ट वितरण समारंभ प्रसंगी परिक्षा उत्तीर्ण खेळाडू. समवेत ॲकॅडमीचे संचालक वसीम हाजी इसहाक शेख. प्रमुख पाहुणे ॲड. समीर वाखारे आदी.

तरुण पिढी आज मोबाईल आणि धुम्रपानाच्या विळख्यात अडकले आहेत. तसेच शारिरीक विकासामध्ये त्रस्त आहेत. तरी तरुणपिढीने वाईट व्यसनापासून दूर राहावे व स्वत:चा आणि आपल्या भारताचे भविष्य उज्वल व्हावे म्हणून जास्तीत जास्त व्यायामाकडे वळावे हेच ध्येय आहे.

यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून ॲड. समीर वाखारे, हाजी शौकतभाई तांबोळी, निसारभाई बागवान आदी उपस्थित होते. या सर्व यशस्वी विद्यार्थ्यांना ॲकॅडमीचे संचालक वसीम हाजी इसहाक शेख (वसीम सर) यांचे मार्गदर्शन लाभले. प्रवेशासाठी संपर्क – ९३२९१९१८५९/९८५०३२७८६५.



कान्हूरपठार (ता.पारनेर) येथील जनता विद्या मंदिर विद्यालयातील सन १९८१ सालच्या माजी विद्यार्थी स्नेहमेळाव्या प्रसंगी सेवानिवृत्त मुख्याध्यापक एस. के. ठुबे. समवेत माजी विद्यार्थी–विद्यार्थिनी. शिक्षक–शिक्षिका.

# शालेय जीवनात अध्यापन करताना विद्यार्थ्यांना संस्कारक्षम शिक्षण दिले

**सेवानिवृत्त मुख्याध्यापक एस. के. ठुबे**

नगर – शालेय जीवनात अध्यापन करताना विद्यार्थ्यांना संस्कारक्षम शिक्षण दिले गेले. त्यावेळेस शिक्षणासाठी केलेली शिक्षा विद्यार्थ्यांना वाईट वाटे मात्र तेच विद्यार्थी आज शिक्षणामुळे व्यवसाय नोकरीत यशस्वी झाल्याने समाधान वाटते, असे प्रतिपादन सेवानिवृत्त मुख्याध्यापक एस. के. ठुबे यांनी केले.

कान्हुरपठार (ता.पारनेर) येथील जनता विद्या मंदिर विद्यालयातील १८८१ सालच्या १० वीच्या वर्गातील माजी विद्यार्थ्यांनी ४३ वर्षांनी आयोजित केलेल्या स्नेहमेळाव्यात श्री. ठुबे बोलत होते.

याप्रसंगी निवृत्त शिक्षक श्री. ठाणगे, इंजिनियर सुभाष ठुबे, गंगाराम ठुबे, सुरेश भागवत, ज्येष्ठ पत्रकार नंदकुमार सातपुते, शिवाजी ठुबे, पोपट ठुबे, मोहन गुंड, शिवाजी भालेराव, सुभाष शेळके, सबाजी मोरे, संजय साळवे, महेंद्र साळवे, गोकुळ घोडके, भास्कर शेळके, सुभाष सागर, संपत कोठारी, बाळू फापाळे, संतोष आवटे, बबन शिंदे, मनोहर पोटे, सुमन सुभाष ठुबे, डॉ. खोडदे, रख्मा साळवे, नंदा आंधळे, अरुणा उंडे, भीमाबाई ठुबे, सुमन ठुबे आदी उपस्थित होते.

४३ वर्षांपूर्वी १० वी पर्यंतचे शिक्षण घेताना आलेले बरे, वाईट, सुख, दु:खाच्या आठवणी, आजपर्यंतच्या जीवनातील अनेकांनी सांगितल्याने वातावरण भारावून गेले होते.

# शहरातील जुन्या बसस्थानकाच्या वास्तूला सेवानिवृत्त एसटी कर्मचाऱ्यांची भावनिक भेट

**नव्याने उभारले जात असलेले बस स्थानक पाहण्यासाठी परमेश्वराकडे आयुष्याची मागणी; डोळ्यात साठवल्या शेवटच्या आठवणी**

नगर – शहरातील माळीवाडा (जुने) बस स्थानक पाडून नव्याने बांधले जात असताना, सेवानिवृत्त एसटी कर्मचाऱ्यांनी आपली कर्मभूमी असलेल्या माळीवाडा बस स्थानकाला भेट देऊन शेवटची आठवण आपल्या डोळ्यात साठवली. तर नव्याने उभारले जात असलेले बस स्थानक पुन्हा पाहण्यासाठी परमेश्वराकडे आयुष्याची मागणी केली. एकत्र जमलेल्या सेवानिवृत्त एसटी कर्मचाऱ्यांनी अनेक जुन्या गोष्टींनी उजाळा दिला.



शहरातील जुन्या बसस्थानकाच्या वास्तूला सेवानिवृत्त एसटी कर्मचाऱ्यांनी भावनिक भेट दिली.

एसटी महामंडळाच्या माळीवाडा बस स्थानकच्या जुन्या इमारतीच्या वैभवाला निरोप देण्यासाठी जिल्ह्यातून सेवानिवृत्त एसटी कर्मचारी हजर होते. सन १९५५ मध्ये एसटी महामंडळाने मोठे बस स्थानक बांधले होते. त्याला ६९ वर्ष झाले. त्याची पडझड झाली असताना, कार्यालयाची जागा अपुरी पडत असताना महामंडळाकडून नवीन बस स्थानक बांधण्याचा निर्णय घेतला आहे. जुने बस स्थानकात अनेक एसटी कर्मचाऱ्यांनी आपली हयात घालवली. कोट्यावधी प्रवासी वाहतुकीचा इतिहास घडवला. महाराष्ट्रात सर्व प्रथम एसटी महामंडळाची मुहुर्तमेढ याच बसस्थानकात रोवली गेली. यामुळे अनेकांचे भावनिक नाते या बसस्थानकाशी जुळले आहे. एसटी महामंडळाने भव्य स्वरुपात अद्यावत बसस्थानक उभारण्याचे काम सुरु केलेले असताना, जुने बस स्थानकाच्या इमारतीला शेवटचा निरोप देण्यासाठी वास्तूला भेट देण्याचे नियोजन करण्यात आले होते, अशी माहिती सेवानिवृत्त कर्मचारी संघटनेचे जिल्हाध्यक्ष बलभीम कुबडे यांनी दिली.

याप्रसंगी सेवानिवृत्त कामगारांनी वास्तूला भेट देऊन, वास्तूच्या आठवणी डोळ्यात साठवल्या. या वास्तूशी अनेकांचे भावनिक नाते जुळले असताना, अनेकांच्या डोळ्यांच्या कडा पाणवल्या. यावेळी वयोवृद्ध सेवानिवृत्त कर्मचारी अर्जुन बकरे, साहेबराव चौधरी, रावसाहेब चौधरी आणि सेवानिवृत्त संघटनेचे पदाधिकारी व सभासद उपस्थित होते. जुन्या वास्तूला भेट देण्याच्या गंगाधर कोतकर यांच्या संकल्पनेने सेवानिवृत्त कर्मचारी जमले होते. नव्या वास्तूच्या उद्घाटनाला सेवानिवृत्त कर्मचारी यांनी उपस्थित राहण्याचा संकल्प केला.





श्री रामकृष्ण एज्युकेशन फौंडेशनमध्ये बालदिनी पंडीत जवाहरलाल नेहरू यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. समवेत विद्यार्थ्यांनी लावलेले खाद्य पदार्थांचे स्टॉल. 'मिकी माऊस आणि मेरी गो राऊंड'चा आनंद लुटला.

# 'श्रीरामकृष्ण' मध्ये बालदिन उत्साहात

नगर – 'करील मनोरंजन जो मुलांचे जडेल नाते प्रभूशी तयाचे' या उक्तीनुसार मुलांचे मनोरंजन करण्यासाठी भारताचे पहिले पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांचा जन्मदिन १४ नोव्हेंबर हा सर्वत्र बालदिन म्हणून साजरा केला जातो. याच दिनाचे औचित्य साधून श्रीरामकृष्ण एज्युकेशन फाउंडेशनचे सेठ नंदलाल धूत इंग्लिश मीडियम स्कूल व मोहनलाल रामावतार मानधना कनिष्ठ महाविद्यालया मध्ये बालदिन उत्साहात साजरा करण्यात आला.

यावेळी सकाळी प्रार्थना सभेत पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या प्रतिमेचे पूजन करून त्यांच्याविषयी माहिती सांगण्यात आली विद्यार्थ्यांना बाल दिनाची गोष्ट सांगून त्याचे महत्त्वही सांगण्यात आले. लहान मुलांना आवडणाऱ्या बच्चे मन के सच्चे, या वाऱ्याच्या बसून विमानी यांसारख्या गीतांचे शिक्षकांनी सादरीकरण केले.

विद्यालयाच्या उप प्राचार्या संपदा देशपांडे, विद्यालयाच्या पर्यवेक्षिका सुषमा उजागरे यांनी विद्यालयातील बालचमुना घेऊन आकाशात फुगे सोडून कार्यक्रमाचे उद्घाटन केले.

मुलांच्या मनोरंजनासाठी खास खेळांचेही आयोजन करण्यात आले होते यामध्ये योग्य ठिकाणी चेहऱ्याला डोळे बंद करून टिकली लावणे, रिंग गेम, नेमबाजी, योग्य रंगसंगती लावणे, वन मिनिट गेम यांसारखे बुद्धीला चालना देणारे व मनोरंजनात्मक खेळ होते. तसेच विद्यालयातील पूर्व प्राथमिक व प्राथमिक वर्गातील विद्यार्थ्यांसाठी त्यांना अतिशय आवडणारे असे मिकी माऊस आणि मेरी गो राऊंड हे खेळ उपलब्ध करून देण्यात आले होते.

खेळाबरोबरच विद्यार्थ्यांसाठी खाद्यपदार्थांचे स्टॉल लावण्यात आले होते. बाल दिनाच्या औचित्य साधून विद्यालयांमध्ये उपलब्ध करून दिलेल्या सर्व खेळांचा आणि खाद्यपदार्थांचा विद्यार्थ्यांनी मनमुराद आस्वाद घेतला. यावेळी संस्थेचे उपाध्यक्ष व शाळा समितीचे चेअरमन नंदकुमार झंवर व मोहनलाल मानधना संस्थेचे सहसचिव बजरंग दरक हे उपस्थित होते.

संस्थेचे अध्यक्ष श्रीगोपाल धूत, उपाध्यक्ष राजेश झंवर, सचिव डॉ. शरद कोलते व विद्यालयाच्या प्राचार्या सौ. जेऊरकर यांनी विद्यार्थ्यांना बाल दिनाच्या शुभेच्छा दिल्या.

# 'इन्फिटी शेअर मार्केट इन्स्टिट्यूट'चे केडगाव उपनगर येथे उद्घाटन

नगर – भारतातील अर्थव्यवस्थेत महत्वपूर्ण वाटा असलेल्या शेअरबाजारचा वाढता प्रभाव लक्षात घेता शेअर मार्केटचा योग्य अभ्यासक्रम सर्वांना समजावा आणि मार्गदर्शन लाभावे, यासाठी केडगाव रोड येथील सातपुते हाईटस येथे इन्स्टिट्यूटचे अध्यक्ष कविता कोतकर यांच्या उपस्थितीत त्यांचा मातोश्री अनिता कोतकर यांच्या हस्ते इन्फिटी शेअर मार्केट इन्स्टिट्यूटचे उद्घाटन करण्यात आले.



सातपुते हाईटस येथे इन्फिटी शेअर मार्केट इन्स्टिट्यूटचे उद्घाटन करताना अनिता कोतकर. समवेत इन्स्टिट्यूटच्या अध्यक्षा कविता कोतकर.

त्यावेळी कविता कोतकर यांनी शेअर मार्केटमध्ये बरेच विद्यार्थी योग्य तज्ञ लोकांचे मार्गदर्शन न घेता इन्व्हेस्टमेंट करतात परिणामी आर्थिक नुकसान होऊन तोटा होतो. या इन्स्टिट्यूटमध्ये सातत्याने विद्यार्थ्यांकडून सराव आणि अभ्यास करून घेतला जातो. त्यांना शेअर मार्केटमध्ये चाललेल्या सर्व अद्ययावत टेक्निकल ज्ञानाची माहिती देऊन सराव केला जातो त्यामुळे या इन्स्टिट्यूटमधून शिक्षण घेतलेले सर्व विद्यार्थी शेअर मार्केटमध्ये यशस्वीपणे करिअर करत आहे, असे मनोगत कविता कोतकर यांनी व्यक्त केले.

यावेळी अनिता कोतकर, अकबर पठाण सर, अमोल बोरूडे, कुशल यादव मेजर, स्वप्निल राठोड आणि सर्व विद्यार्थी उपस्थित होते.



अहिल्यानगर येथील लाड सुवर्णकार समाज विठ्ठल रुक्मिणी मंदिरात सालाबादप्रमाणे दीपोत्सव उत्साहात साजरा करण्यात आला. (छाया – सुरेश मैड)

## लाड सुवर्णकार समाज विठ्ठल रुक्मिणी मंदिरात दीपोत्सव थाटात

नगर – येथील लाड सुवर्णकार समाज विठ्ठल रुक्मिणी मंदिरात सालाबादप्रमाणे दीपोत्सव उत्साहात साजरा करण्यात आला.

सालाबादप्रमाणे हरी ॐभजनी मंडळातील भगिनी कोजागिरी पौर्णिमेपासून ते त्रिपुरारी पौर्णिमेपर्यंत दररोज पहाटेच श्री विठ्ठल रुक्मिणी, श्रीनरहरी महाराज सोनार लक्ष्मीनारायण, श्री महादेव, श्री स्वामी समर्थ यांची काकड आरती करून भक्तिमय प्रसन्न वातावरण निर्माण करतात. आज सर्व मूर्तीना लोण्याचा पोशाख करण्यात आला होता व तसेच देव दिपावली निमित्त अन्नकोट करण्यात आला.

याप्रसंगी समाजातील बंधू–भगिनी व परिसरातील हरी ॐ भजनी मंडळातील भगिनीनी कोजागिरी पौर्णिमेपासून दररोज पहाटे विठ्ठल रुक्मिणी नरहरी महाराज, लक्ष्मीनारायण श्री स्वामी समर्थ मूर्तीस पहाटेच काकड आरती, पूजाअर्चा, भजन, रोज नित्यनियमाने सेवा दिली.

हरीॐ भजनी मंडळातील भगिनी सौ.छाया लखारा, सौ.सुनिता कुलट, मंगल डागवाले, सगिता बेरड, सुमन मोकाटे, सिंधू सुडके, शालिनी राठौर, लिलाव शहरकर,वंदना शहरकर, वनिता शहरकर, सुशीला रत्नापूरकर यांनी यामध्ये सहभाग दिला. दिपाली लखारा यानी अत्यंत मनमोहक आकर्षक रेखीव रांगोळी काढली. याप्रसंगी अध्यक्ष संजय देवळालीकर, मुकुंद निफाडकर, शरद कुलथे,किशोर शहरकर, व समाजबंधू–भगिनी उपस्थित राहून दीपोत्सवाची शोभा वाढवली.

# मौजमजा आणि आनंदाने साजरा केला गरिब मुलांनी बालदिन

**स्नेहबंध'मुळे चिमुकल्यांनी प्रथमच अनुभवला बालदिन**

नगर – कधीच खेळायला न मिळणारा फुगा त्यांनी कदाचित पहिल्यांदा अनुभवला. त्यात चॉकलेट, बिस्किट मिळाल्याने त्यांच्या आनंद गगनात मावेना. हुर्ये... हुर्ये... करत ही मुले भारावून गेली. आपण खूप काहीतरी भारी केले आहे, हे त्यांच्या डोळ्यांत दिसत होते. निमित्त होते सावेडी येथील रासनेनगर भागात गरीब मुलांसोबत साजरा झालेल्या बालदिनाचे.

स्नेहबंध सोशल फौंडेशनचे अध्यक्ष डॉ. उद्धव शिंदे यांच्या संकल्पनेतून हा बालदिन रासनेनगर भागातील पालामध्ये राहणाऱ्या कुटुंबीयांच्या मुलांसोबत साजरा करण्यात आला.



सावेडीतील रासनेनगर भागात गरीब मुलांसोबत 'स्नेहबंध'तर्फे बालदिन साजरा करण्यात आला.

१४ नोव्हेंबर देशाचे पहिले पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांची जयंती किंवा बालदिन म्हणून ओळखली जाते. हा संपूर्ण दिवस मुलांना समर्पित आहे. मात्र पालात राहणाऱ्या या गरीब मुलांना कसला बालदिन. त्यांना सर्व दिवस सारखेच असतात. मात्र त्यांचाही बालदिन मौजमजा आणि आनंदाने साजरा व्हावा या उद्देशाने स्नेहबंधने त्यांच्यात जाऊन बालदिन साजरा केला. या मुलांना फुगे, चॉकलेट, बिस्किट पुडे देण्यात आली. यामुळे त्यांच्या चेहऱ्यावर आनंद झळकत होता. त्यांनी फुगे हवेत उडवली, यावेळी त्यांच्या निरागस हास्याने या परिसरातील वातावरण खुलून गेले होते. आपल्या आयुष्यात या मुलांनी प्रथमच बालदिन अनुभवला. याबद्दल त्यांच्या पालकांनी डॉ. उद्धव शिंदे व त्यांचे सहकारी निशांत पानसरे, हेमंत ढाकेफळकर आभार मानले.

**मुलांना बालपण देताना, आपणही ते पुन्हा एकदा अनुभवतो**

मुलांना बालपण खऱ्या अर्थाने अनुभवता यावे, लहान वयाचेच अनुभव त्यांना घेता यावेत, यासाठी प्रयत्न करणे म्हणजे बालदिन. आजच्या काळात त्याची अशीच व्याख्या करावी लागेल. गरीब मुलांना हे बालपण मिळवून देण्याची जबाबदारी सामाजिक संघटनांचीही आहे.

मुलांना बालपण देताना, आपणही ते पुन्हा एकदा अनुभवू शकतो. डॉ. उद्धव शिंदे, अध्यक्ष, स्नेहबंध फौंडेशन.

मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक सुभाष चंदनमल गुंदेचा यांनी नवा मराठा मुद्रणालय, आचार्य गुंदेचा चौक, अहिल्यानगर येथे हे पत्र छापून येथेच प्रसिद्ध केले.



नगर जल्लोष कार्यक्रमात वंचित मुलांना फराळ, फटाक्यांच्या वाटपप्रसंगी आनंदी झालेली मुले. समवेत शिंगवी ज्वेलर्सचे गुंजन शिंगवी आदी.

# 'नगर जल्लोष'मुळे बालघर प्रकल्पातील वंचित मुलांच्या चेहऱ्यावर उमटले हसू

नगर – येथील तपोवन रोडवरील बालघरातील वंचित मुलांच्या हक्काच्या घरात दीपावलीनिमित्त नगर जल्लोष परिवाराच्या वतीने फराळ, फटाके देऊन दीपोत्सव साजरा करण्यात आला. त्यामुळे वंचित मुलांच्या चेहऱ्यावर हसू उमटून आनंदाश्रू तरळले. हॉटेल ब्रम्ह भोजच्या वतीने देण्यात आलेल्या फराळाने व संस्थेच्या वतीने देण्यात आलेल्या फटाक्यांनी प्रकाशाच्या या सणाला नवी झळाळी मिळाली. फराळ करीत आणि फटाके फोडत दिव्यांच्या उजेडात नि फटाक्यांच्या आवाजात मुलांनी दिवाळीचा मनसोक्त आनंद लुटला. विशेष म्हणजे संस्थेचे संयोजन समितीप्रमुख व शिंगवी ज्वेलर्सचे गुंजन शिंगवी यांचा वाढदिवस मुलांसोबत केक कापून साजरा करण्यात आला.

यावेळी श्री. शिंगवी म्हणाले की, मुलांच्या चेहऱ्यावरील आनंद पाहून समाधान वाटले. हा दिवस माझ्यासाठी कायम अविस्मरणीय असेल. बालघरला हवी ती मदत करण्याचा प्रयत्न करीन, असे सांगितले.

संस्थेचे अध्यक्ष सागर बोगा म्हणाले की, दरवर्षीप्रमाणे याही वर्षी वंचित मुलांना दिवाळीच्या शुभेच्छा देण्यासाठी येथे आलो. संस्थेच्या माध्यमातून मदतीचे हात जोडणे हाच नगर जल्लोष परिवाराचा उद्देश आहे. या मुलांच्या चेहऱ्यावर फुललेले हसू आमच्यासाठी अनमोल आहे. मुलांच्या उज्ज्वल भविष्यासाठी प्रयत्नशील राहू.

याप्रसंगी सचिन बोगा, लौकिक शिंगवी, राष्ट्रपती पुरस्कार प्राप्त शिक्षक नारायण मंगलारम, प्रकाश मच्चा, अक्षय आंबेकर, पल्लवी बोगा, ओवी बोगा, बालघरचे युवराज गुंड उपस्थित होते. या कार्यक्रमामुळे बालघरातील वंचित मुलांच्या जीवनात थोडीशी आनंदाची झुळूक आली, अशी भावना युवराज गुंड सरांनी व्यक्त केली.

# आठरे पाटील स्कूलने विजेतेपद पटकावून फुटबॉलमध्ये ठरले चॅम्पियन

## आंतर शालेय फुटबॉल स्पर्धा, मुलींमध्ये श्री साई इंग्लिश मीडियम स्कूल विजयी

नगर – शहरातील वाडियापार्क क्रीडा संकुल येथे स्टेअर्स फाउंडेशन व अहिल्यानगर जिल्हा क्रीडा कार्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित आंतर शालेय फुटबॉल स्पर्धेत १४ व १७ वर्षे वयोगटातील मुलांच्या संघात आठरे पाटील स्कूलने विजेतेपद पटकावून चॅम्पियन चषकावर नाव कोरले. विजयी संघाच्या खेळाडूंनी मैदानावर एकच जल्लोष केला होता. तर १७ वर्षा आतील मुलींच्या संघात श्री साई इंग्लिश मीडियम स्कूलने विजेतेपद पटकाविले.




स्टेअर्स फाउंडेशन व अहिल्यानगर जिल्हा क्रीडा कार्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित आंतर शालेय फुटबॉल स्पर्धेत १७ वर्षे वयोगटात आठरे पाटील पब्लिक स्कूल विरुध्द आर्मी स्कूल (एसी सेंटर) यांच्यात अटातटीचा रंगलेला अंतिम सामना. स्टेअर्स फाउंडेशन व अहिल्यानगर जिल्हा क्रीडा कार्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित आंतर शालेय फुटबॉल स्पर्धेतील विजयी व उपविजयी संघांना चषक प्रदान करण्यात आले.

१४ वर्ष वयोगटात रंगलेल्या आठरे पाटील पब्लिक स्कूल विरुध्द आर्मी स्कूल (एसी सेंटर) संघातील अंतिम सामन्यात आठरे पाटीलच्या अशोक चंद याने केलेल्या गोलने संघाला विजेतेपद मिळवून दिले. १–० गोलने आठरे पाटील स्कूलचा संघ विजयी झाला.

१७ वर्षे वयोगटात अंतिम सामना आठरे पाटील पब्लिक स्कूल विरुध्द आर्मी स्कूल (एसी सेंटर) यांच्यात अटातटीचा झाला. दोन्ही तुल्यबळ संघ शेवट पर्यंत एकमेकांना भिडले होते. पहिल्या हाफ मध्ये एकही गोल झाला नाही. दुसऱ्या हाफ मध्ये आर्मी स्कूल कडून वेदांत वाघ याने १ गोल करुन आघाडी घेतली. तर शेवटच्या क्षणात आठरे पाटील स्कूल कडून भानू चंद या खेळाडूने १ गोल करुन बरोबरी साधली. शेवटी वेळ संपल्याने सामना टाय ब्रेकरवर गेला. पेनल्टीवर आठरे पाटील कडून भानु चंद, गौरव आठरे, अभय थोरात, संग्राम गीते यांनी प्रत्येकी १ गोल केला. तर आर्मी स्कूल कडून पार्थ मस्कर, आयुष शिर्के यांनी प्रत्येकी १ गोल केला. ४–२ गोलने आठरे पाटीलचा संघ विजयी झाला.

या स्पर्धेत १७ वर्षातील मुली विजयी श्री साई इंग्लिश मीडियम स्कूल, उपविजयी कर्नल परब स्कूल व तृतीय क्रमांक आर्मी स्कूल (एसी सेंटर), १४ वर्षे मुले विजयी आठरे पाटील पब्लिक स्कूल, उपविजयी आर्मी स्कूल (एसी सेंटर), तृतीय ऑक्झिलियन कॉन्व्हेंट स्कूल आणि १७ वर्ष मुले विजयी आठरे पाटील पब्लिक स्कूल, उपविजयी आर्मी स्कूल (एसी सेंटर), तृतीय श्री साई इंग्लिश मीडियम स्कूल संघाने बक्षीसे पटकाविली. टूर्नामेंट ऑफ द प्लेयरचा मानकरी आर्मी स्कूल (एमआयआरसी) चा खेळाडू सोहेल त्रिपुरा ठरला.

पारितोषिक वितरण समारंभासाठी प्रमुख पाहुणे म्हणून मनपाचे उपायुक्त डॉ. प्रदीप पठारे, डिस्ट्रिक्ट फुटबॉल असोसिएशनचे अमरजीत शाही, राष्ट्रीय खेळाडू वैशाली आढाव–पार्ले, उद्योजक आदेश भगत, डिस्ट्रिक्ट फुटबॉल असोसिएशनचे सहसचिव गोपीचंद परदेशी, उद्योजक हर्षल मिसाळ, ऑलम्पिक असोसिएशनचे जिल्हा सचिव शैलेश गवळी, स्टेअर्स फाउंडेशनचे अध्यक्ष विजूशेठ टायरवाले, उपाध्यक्ष डॉ. प्रताप पटारे, विन्सेंट फिलिप्स, डॉ. प्रशांत पटारे, आठरे पाटील पब्लिक स्कूलचे संस्थापक अध्यक्ष डॉ. अनिल आठरे, राष्ट्रीय स्केटिंग खेळाडू प्रशांत पाटोळे, अरुणोदय क्रीडा प्रशिक्षण केंद्राचे संचालक महेश आनंदकर, वैभव मनोदिया, मनीष राठोड, सिद्धार्थ वांद्रे, राष्ट्रीय कबड्डी पंच बळीराम सातपुते आदींसह खेळाडू, प्रशिक्षक व पालक उपस्थित होते.

सर्व उपस्थित पाहुण्यांच्या हस्ते स्पर्धेतील विजयी, उपविजयी व तृतीय क्रमांकाच्या संघांना चषक, मेडल व बक्षीस प्रदान करण्यात आले. स्पर्धेत मुलांमध्ये १४ वर्ष वयोगटात उत्कृष्ट खेळाडू– अशोक चंद (आठरे पाटील स्कूल), उत्कृष्ट डिफेंडर– सार्थक विभुते (आर्मी स्कूल), उत्कृष्ट गोलकीपर– अथर्व गिरजे (आठरे पाटील स्कूल), १७ वर्ष वयोगट उत्कृष्ट खेळाडू– भानु चंद (आठरे पाटील स्कूल), उत्कृष्ट डर्फेडर– अम्मार शेख (श्री साई इंग्लिश), उत्कृष्ट गोलकीपर– आयुष शिर्के (आर्मी स्कूल एसी सेंटर), तसेच १७ वर्ष वगोगटातील मुलींमध्ये उत्कृष्ट खेळाडू निकिता रामावत (श्री साई इंग्लिश), स्वराली देशमुख (कर्नल परब स्कूल), उत्कृष्ट स्ट्रायकर– आरती कर्डिले (आर्मी स्कूल एसी सेंटर) या खेळाडूंचा सन्मान करण्यात आला.

स्पर्धेचे पंच म्हणून शशिकांत गायकवाड, ऋषी कनोजिया, जोयल पिल्ले, परेश म्याना, ओम दंडवते, प्रणव पंडित, सागर चेमटे यांनी काम पाहिले. स्पर्धा यशस्वी करण्यासाठी स्टेअर्स फाउंडेशनचे सचिव प्रसाद पाटोळे, सहसचिव सुभाष कनोजिया, खजिनदार मयूर टेमक, सदस्य वृषाली पटेकर, निलेश हराळे, राहुल जोशी, अर्जुन खेकडे आदींनी परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे रुपेश पस्पूल यांनी केले. आभार विन्सेंट फिलिप्स यांनी मानले.

## अय्यप्पा मंदिरात २१ नोव्हेंबरला शास्त्रीय गायन कार्यक्रम

नगर – सावेडी येथील अय्यप्पा मंदिरा मध्ये ६० दिवसांच्या



मंडल महापूजा आणि मकर विल्लकु महोत्सवा निमित्ताने २१ नोव्हेंबर सायंकाळी ७ वाजता वेदांत कुलकर्णी आणि भार्गव देशपांडे यांचे शास्त्रीय आणि उपशास्त्रीय गायन होणार आहे. त्यांना तबला चैतन्य पांचाळ, संवादिनी वेदांत कानडे संगत करणार आहे, नंतरदीप आराधना, महाआरती, पुष्पाभिषेक, अथर्व पूजा व दर्शन, अर्चना, निरांजन व हरीवरासम नंतर महाप्रसाद होणार आहे अय्यप्पा मंदिरा, रेणावीकरनगर, सावेडी, अहिल्यानगर येथे होणाऱ्या या शास्त्रीय गायन कार्यक्रमाचा लाभ घ्यावा असे आवाहन करण्यात आले आहे.

# आंतरशालेय फुटबॉल स्पर्धेत मुलींमध्ये श्री साई इंग्लिश मीडियम स्कूलने पटकाविले विजेतेपद

### मुलांमध्ये आठरे पाटील विरुध्द आर्मी स्कूल (एसी सेंटर) मध्ये रंगणार अंतिम सामना

नगर – शहरातील वाडियापार्क क्रीडा संकुल येथे स्टेअर्स फाउंडेशन व अहिल्यानगर जिल्हा क्रीडा कार्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित आंतर शालेय मुला–मुलींच्या फुटबॉल स्पर्धेत मुलींच्या श्री साई इंग्लिश मीडियम स्कूल संघाने विजेतेपद पटकाविले. तर मुलांमध्ये १७ व १४ वर्ष या दोन्ही वयोगटात आठरे पाटील पब्लिक स्कूल विरुध्द आर्मी पब्लिक स्कूल (एसी सेंटर) यांच्यात अंतिम सामना रंगणार आहे.



१७ वर्षा आतील मुलींचा अंतिम सामना श्री साई इंग्लिश मीडियम स्कूल विरुध्द कर्नल परब स्कूल यांच्यात रंगला होता. दोन्ही संघ तुल्यबळ असल्याने पहिला हाफ मध्ये कोणाकडूनही गोल झाला नाही. दुसऱ्या हाफ मध्ये श्री साई इंग्लिश मीडियम स्कूलने आक्रमक खेळी केली. यामध्ये शेवटच्या क्षणी निकिता रमावत हिने १ गोल करुन १–० गोलने श्री साई इंग्लिश मीडियम स्कूलच्या संघाला विजय मिळवून दिला. मुलींमध्ये तिसऱ्या स्थानावर आर्मी पब्लिक स्कूलचा संघ राहिला. तर १७ वर्षा आतील मुलांमध्ये श्री साई इंग्लिश मीडियम स्कूलने तिसरे स्थान मिळवले आहे. स्पर्धेचे पंच म्हणून सागर चेमटे, शशी गायकवाड, जोएल पिल्ले, ओम दंडवते, परेश म्याना, प्रणव पंडित, ऋषी कनोजिया काम पाहिले.





स्नेहालय इंग्लिश मिडियम स्कूलच्या अंतर्गत शाळेतील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी तसेच बालभवनमधील शिक्षकांसमवेत आदर्श शिक्षक उमेश घेवरीकर.

# शैक्षणिक गुणवत्तेसाठी कल्पकता व नवनविन उपक्रमांची जोड आवश्यक

### आदर्श शिक्षक उमेश घेवरीकर यांचे प्रतिपादन

नगर – उमेश घेवरीकर सरांनी आपल्या मार्गदर्शनातून आदर्श शिक्षण पध्दती या संकल्पनेवर भाष्य करताना म्हटले की, विद्यार्थ्याला घडवतांना सर्वांगीण दृष्ट्या विचार करणे महत्वाचे आहे. शैक्षणिक विकासबरोबर, विद्यार्थ्यांचे वर्तन, चारित्र्य, नितीमुल्य, व्यक्तीमत्व विकास, समाजिक विकास महत्वाचा आहे. आजच्या काळात सर्वच शाळेत शैक्षणिक गुणवत्तेसाठी कल्पक व नवनवीन उपक्रमांची जोड आवश्यक आहे, असे प्रतिपादन आदर्श शिक्षक उमेश घेवरीकर यांनी केले.

स्नेहालय इंग्लिश मिडियम स्कूलच्या अंतर्गत शाळेतील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी, सेवावस्तीतील बालकांबरोबर कार्य करणाऱ्या बालभवनमधील शिक्षकांसाठी उपक्रमशिलता व शिक्षक या प्रशिक्षणाचे आयोजन केले होते.

आजच्या काळात लुप्त पावलेल्या आदर्श शिक्षणपध्दतीला उजाळा देणे, जीवन शिक्षण मंदिरामध्ये विद्यार्थ्यांना घडवताना कोणत्या प्रकारची काळजी घ्यावी, अध्यापनातील प्रात्येक्षिक उदाहरणे व पध्दतींचा अभ्यास कसा करावा. या सर्व बाबींवर सखोल उहापोह करण्यासाठी राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार प्राप्त व शेवगांवमधील भारदे हायस्कूल मध्ये पर्यवेक्षक म्हणून कार्यरत असलेले उमेश घेवरीकर सरांना आमंत्रित केले होते.

सर्वप्रथम प्रमुख पाहुण्यांचे मायेचा हात व गुलाबपुष्प देऊन स्वागत केले. शाळेच्या मुख्याध्यापिका वीणा मुंगी यांनी प्रमुख पाहुण्यांचे ओळख व प्रास्तावना केली.

विद्यार्थ्यांना अध्यापन करतांना शैक्षणिक वातावरण निर्मिती करणे आवश्यक आहे. त्यासाठी शैक्षणिक साधने, प्रात्येक्षिक उदाहरणे व इतर साधने, तसेच विदयार्थ्याला अध्यापन व अध्ययन प्रकियेत प्रत्यक्षरित्या सहभागी करुन घेणे महत्वाचे आहे. विद्यार्थ्याला जर प्रात्यक्षिक रित्या शिकविले तर आयुष्यभर विसरत नाही. विद्यार्थ्यांच्या भावनेचा आदर केला तरच ते आपला आदर करतील असेही घेवरीकर म्हणाले.

सरांनी अभ्यास नाटीका, बालनाटिका, पथनाट्य, याद्वारे मुलांना कसे रंजक पणे शिकवता येऊ शकते हे सांगितले. परीक्षेसाठी विद्यार्थी न घडविता त्यांना एक भावी आयुष्य देण्यासाठी एका शिक्षकांनी मातृह्रदय असणे अत्यंत आवश्यक आहे असे त्यांनी व्यक्तव्य केले.

विविध माध्यमांद्वारे कशा प्रकारे विदयार्थ्यांना शैक्षणिक गोडी व आवड निर्माण करु शकतो हे शिक्षकांना प्रत्येक्षरित्या करुन दाखविले. त्यांचा मी सानेगुरुजी बोलतोय हा एकपात्री अभिवाचनाचा कार्यक्रम उपस्थित सर्वांनच खूप भावला.

या प्रशिक्षण सत्रात एकूण ६२ शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी सहभागी झाले होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचलन यास्मिन सय्यद यांनी तर आभार राजू पांढरे यांनी व्यक्त केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी स्नेहालय इंग्लिश मिडियमचे सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी आदींनी परिश्रम घेतले.

# स्नेहालय इंग्लिश मिडीयम स्कूलमध्ये बाल दिनानिमित्त मेळाव्याचे आयोजन

नगर – स्नेहालय संचलित इंग्लिश मिडीयम स्कूलमध्ये बाल दिनाच्या मुहूर्तावर एक विशेष बाल मेळाव्याचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमाचे उद्घाटन स्नेहालय इंग्लिश मिडीयम स्कूलचे मानद संचालक राजेंद्र शुक्रे आणि स्नेहालय अनिवासी विभाग प्रकल्पांचे संचालक हनीफ शेख यांच्या हस्ते रिबीन कापून झाले.



स्नेहालय इंग्लिश मिडीयम स्कूलमध्ये बालदिनानिमित्ताने आयोजित मेळाव्यात स्टॉलमध्ये रंगलेले विद्यार्थी.

पंडित जवाहरलाल नेहरू (चाचा नेहरू) यांचा जन्मदिन देशभर बाल दिन म्हणून साजरा केला जातो. या दिवसाचे महत्त्व ओळखून, स्नेहालय इंग्लिश मिडीयम स्कूलने विद्यार्थ्यांना शैक्षणिक आणि व्यावहारिक ज्ञान देण्याचा उद्देश ठेवत हा बाल मेळावा आयोजित केला होता.

बाल मेळाव्यात विद्यार्थ्यांनी विविध स्टॉल्स लावले होते. त्यात अल्पोहार, भाजीपाला, स्टेशनरी साहित्य, फास्ट फूड, शीतपेय, चहा इत्यादी वस्तू विक्रीसाठी उपलब्ध होत्या. शाळेतील शिक्षक, पालक आणि स्नेहालय कॅम्पसच्या कर्मचाऱ्यांनी विद्यार्थ्यांच्या स्टॉल्सवरून खरेदी मुले हसत खेळत गणितीय हिशोब करत होते, ज्यामुळे विद्यार्थ्यांसह पालकांच्या चेहऱ्यावरही आनंद दिसून आला. विद्यार्थ्यांनी व्यवसायाचे महत्त्व समजून स्टॉल्सवर विविध प्रॉडक्ट्स विकण्याचे अनुभव घेतले.

तसेच ज्या विद्यार्थ्यांनी स्टॉल लावले नव्हते ते त्यांच्या मित्रा मैत्रिणींना प्रोत्साहन देत होते. एकूण आनंदमयी वातावरणात हा आनंद मेळावा साजरा झाला. या मेळाव्यात एकूण २५ विविध स्टॉल्स मांडले गेले होते, आणि पालकांनी दिलेल्या माहितीनुसार एकूण १०००० रुपयांची उलाढाल झाली.

हा उपक्रम विद्यार्थ्यांना व्यवसायविषयक ज्ञान देण्यासाठी महत्त्वपूर्ण ठरला, तसेच त्यांच्या आत्मविश्वासातही वाढ झाली.शाळेच्या मुख्याध्यापिका वीणा मुंगी, प्रशासकीय अधिकारी राजू पांढरे, पर्यवेक्षक जयश्री खरात तसेच शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचारी यांनी हा मेळावा यशस्वी करण्यासाठी परिश्रम घेतले.

# अय्यप्पा मंदिरात मकर विल्लकु उत्सवास प्रारंभ

नगर– श्री अय्यप्पा मंदिर हे अत्यंत आकर्षक असून यामध्ये अय्यप्पा स्वामी, गणपती व सरस्वतीची स्वतंत्र मंदिरे आहे. या मंदिरामध्ये ६० दिवसांच्या मंडल महापूजा आणि मकर विल्लकु महोत्सवास प्रारंभ झाला आहे. त्या निमित्ताने रोज मंदिर दिव्यांनी उजळून निघत असून, धार्मिक कार्यक्रम होत आहे, अशी माहिती अध्यक्ष के के शेट्टी यांनी दिली आहे



सावेडीतील या मंदिरात रोज संध्याकाळी दर्शनाला भाविक गर्दी करतात, उत्सावा निम्मित ६० दिवस दररोज पूजा पुढीलप्रमाणे होणार आहे. पहाटे ५.३० वा. पल्लीयुनथरल नंतर निर्मल दर्शन, सकाळी ६ वा. अभिषेक, गणपती होम, स. ७ वा. प्रसन्न पूजा तर नंतर स. १० वाजेपर्यंत अर्चना, निरांजन व विविध पूजा तसेच संध्या. ५. ३० वा अलंकार दर्शन, नंतर दीप आराधना, महाआरती, पुष्पाभिषेक, रात्री ८ वा. अथर्व पूजा व नंतर दर्शन, अर्चना, निरांजन आणि भजन व हरीवरासम नंतर महाप्रसाद होत आहे त्याचा लाभ मोठ्या संख्येने भाविक घेत आहे

तसेच विशिष्ट दिवशी धार्मिक सांस्कृतिक कार्यक्रम होणार आहे तर २६ डिसेंबरला मंडलपूजा होणार आहे. उत्सवाची सांगता १४ जानेवारी २०२५ ला मकर वीलक्कु उत्सवाने होणार आहे. दक्षिण भारतीयासह महाराष्ट्रातील भाविकाची श्रद्धा असलेले अय्यप्पाचे मंदिर केरळ मधील शबरीमळा येथे असून त्या मुख्य उत्सवाच्या धर्तीवर नगरमध्ये हा केला जातो. या दोन महिन्याचा उत्सवात भाविकांनी रोज सहभागी व्हावे, असे आवाहन अय्यप्पा सेवा समितीच्या पदाधिकारी यांनी केले आहे.



सेवापुर्ती निमित्त नगरसचिव विभागातर्फे राजेंद्र व्यापारी याचां सत्कार करताना नगरसचिव मेहेर लहारे. समवेत इतर कर्मचारी.

# राजेंद्र व्यापारी हे महानगरपालिकेतील प्रामाणिक कर्मचारी

### मेहर लहारे यांचे प्रतिपादन; सेवापुर्ती निमित्त नगरसचिव विभागाच्या वतीने सत्कार

नगर – नगरपालिका, ते महानगरपालिके मध्ये राजेंद्र व्यापारी यांनी ३६ वर्ष सेवा केली असून त्यांच्या सेवाकाळामध्ये कामाकाज करत असतांना नागरीकांना सहाकार्याची भावना ठेवून तसेच त्यांच्यावर सोपवीलेली जबाबदारी त्यांनी प्रमाणीक पणे पार पाडली सकरात्मक दृष्टिकोन ठेवून काम मार्गी लावण्यासाठी तत्परतेची भूमिका पार पाडत असतात प्रामाणिक पण हा त्यांच्या गुण असून महापालिका पदाधिकाऱ्याच्या कार्यालयामध्ये चांगले काम केले असल्याचे प्रतिपादन नगरसचिव मेहर लहारे यांनी केले

महानगरपालिकेचे कर्मचारी राजेंद्र व्यापारी हे सेवापुर्ती निमित्त नगरसचिव विभागाच्या वतीने त्यांचा यथोचित सत्कार करताना नगरसचिव मेहेर लहारे. यावेळी सुधाकर भुसारे, राजेश लयचेट्टी, किशोर कानडे, दत्तात्रय ढवळे, सोनु चौधरी, शेखर बनकर, श्रीमती सावळे, राजेश कार्ले, बाळासाहेब भोर, राजेंद्र कडव, अक्षय घोडके, प्रदीप निलाखे, ऑकार कराळे, शांतवन बडेकर, राजु दळवी, सचिन आकडकर इत्यादी कर्मचारी वृंद उपस्थित होते

यावेळी सुधाकर भुसारे यांनी मनोगत व्यक्त केले तसेच आहिल्यानगर महानगरपालिका कर्मचारी पतसंस्थेचे माजी चेअरमन किशोर कानडे यांनी प्रस्ताविक केले. व आयुक्त यांचे स्वीय सहाय्यक राजेश लयचेट्टी यांनी आभार व्यक्त केले.




*असो काहिली वा*
*बरसात पावसाची*

*असो तप्तता वा*
*साथ गारव्याची*

*जीवनरथ अवघा*
*या परीघात फिरतो*

*पाखरु उडून जाते*
*परी रंग मागे उरतो*

# प्राचार्यांची कर्मचाऱ्याशी फ्री स्टाईल!



उत्तर प्रदेशामधील हाथरस येथील जी.एस. कॉलेजच्या प्राचार्यांनी वादानंतर कॉलेजमध्ये काम करणाऱ्या कर्मचाऱ्यावर हल्ला केला. हजेरीवरून हाणामारी झाली. कॉलेजचा कर्मचारी ऑफिसमध्ये उशिरा पोहोचला, त्यानंतर संतापलेल्या प्राचार्यांनी त्याला आधी थप्पड मारली आणि नंतर बूट काढून मारहाण केली. बाबू नैन कमल हे शाळेमध्ये कर्मचारी आहेत. शाळेच्या प्राचार्यांशी त्यांचा सतत वाद सुरू होता. ते पाच मिनिटे उशिरा शाळेत पोहोचले, तेव्हा प्राचार्य कैलाश चंद यांनी त्यांची गैरहजेरी लावली. हजेरी पुस्तिकेमध्ये गैरहजेरीची खूण केल्यावर कर्मचारी आणि प्राचार्य यांच्यात वादावादी होऊन हिंसक वळण लागले आणि प्राचार्यांनी आधी बाबूला शिवीगाळ करून ऑफिसमधून निघून जाण्यास सांगितले आणि नंतर चपला काढून कर्मचाऱ्याला मारहाण केली. मारहाण करत असताना प्राचार्य कर्मचाऱ्याला सतत शिवीगाळ करत होते, त्यानंतर कॉलेजचे कर्मचारी कार्यालयात आले आणि दोघांमधील भांडण मिटवले.

# कॅलिडोस्कोप


## केकचा तुकडा अडीच लाखांना!



बर्थडे पार्टी आणि इतर पार्ट्यांमध्ये केक कापले जातात. केकची किंमतही बाजारामध्ये इतकी कमी आहे की कोणालाही परवडेल. ५० रुपयांपासून ते हजारो रुपयांपर्यंतचे केक बाजारात मिळतात. या सर्वांच्या किंमती त्यांचे वजन आणि डिझाइनवर अवलंबून असतात.
अलीकडेच एका केकचा २.४० लाख रुपयांना लिलाव झाला. यामागे कोणतेही वजन किंवा डिझाइन नसून त्याचा इतिहास प्रिन्स आणि एलिझाबेथच्या लग्नाशी संबंधित आहे. या कारणामुळे अडीच लाख रुपयांची बोली लागली. राणी एलिझाबेथ सेकंड आणि प्रिन्स फिलिपबद्दल कोणाला माहिती नाही? १९४७ मध्ये त्यांच्या लग्नात कापलेलेल्या केकचा आता ७७ वर्षांनंतर लिलाव झाला आहे. हा तुकडा विकत घेतलेल्या व्यक्तीचे नाव मॅरियन पॉलसन आहे. २० नोव्हेंबर १९४७ रोजी झालेल्या या लग्नात नऊ फूट उंच आणि २७ किलो वजनाचा केक कापण्यात आला होता, त्याची किंमत त्या वेळी ५०० पौंड होती. या केकचा ऑनलाइन लिलाव करण्यात आला असून त्याचा लिलाव करणाऱ्या ऑक्शन हाउसचे नाव रेमन डॅन्सी आहे.

रेमन डॅन्सीच्या मते, या केकची खासियत म्हणजे तो दोन्ही कुटुंबांनी मिळून कापला होता. तो साखरेच्या कलाकृतींनी सजवला गेला आहे आणि हा केक त्या काळात प्रत्येक जोडप्याचा आवडता केक होता. या केकचा काही भाग धर्मादाय स्वरूपात वाटण्यात आला. या केकचा काही भाग प्रिन्स चार्ल्स या जोडप्याच्या पहिल्या मुलासाठी जतन करण्यात आला होता. गेल्या अनेक वर्षांपासून या केकचा लिलाव होत आहे. २013 मध्ये या केकचा एक स्लाईस १.९१ लाख रुपयांना विकला गेला होता; मात्र हा केक आता खाण्यास योग्य नाही.

# खेड्यातील मुलीने कमवले २ कोटी!



शेअर बाजारामध्ये केवळ मुलंच नाही तर मुलीसुद्धा जोरदार कमाई करत आहेत. अनेक महिला गुंतवणूकदार शेअर बाजारातून खोऱ्याने पैसा कमावत आहेत. या महिला मल्टिबॅगर रिटर्न मिळवत आहेत. 'सेबी'ने एक अहवाल जाहीर केला आहे. त्यानुसार, २०२३-२४ मध्ये फ्यूचर अँड ऑप्सन ट्रेडिंगमध्ये ९१.९ टक्के पुरुषांना फटका बसला, तर ८६.३ टक्के महिलांना तोटा सहन करावा लागला. म्हणजे ८.१ टक्के पुरुष आणि जवळपास १४ टक्के महिलांनी ट्रेडिंगमध्ये पैसा कमवण्यात यश मिळवले. शेअर बाजारामध्ये एका मुलीने तिची समयसूचकता, अभ्यास आणि शेअर कंपन्यांची इत्यंभूत माहिती मिळवत ११ वर्षात दोन कोटी रुपयांचा पोर्टफोलिओ तयार केला. पश्चिम बंगालमधील बर्दवान येथील कविता नावाच्या गुंतणूकदार मुलीने हा पराक्रम केला आहे. घरातील बेताची परिस्थिती असताना तिने शिक्षणामध्ये चमकदार कामगिरी केली. तिने ऑस्ट्रेलियातील एका कंपनीत आयटी प्रोफेशनल म्हणून कामाला सुरुवात केली. नोकरीशिवाय शेअर बाजारात तिने नशीब आजमावणे सुरू केले. फ्यूचर ऑप्शन ट्रेडिंगमध्ये तिने कोट्यवधींचा पोर्टफोलिओ तयार केला. कविता अभ्यासात हुशार होती. परिस्थिती बेताची असल्याने १४ व्या वर्षापासून तिने लहान मुलांची शिकवणी सुरू केली. त्यातून ती स्वतःचे शिक्षण पूर्ण करत होती. तिचे नातेवाइक तिला पैसे द्यायचे, ते पैसे ती जमा करायची. आईला पैशांची गरज पडली, तर ती ही रक्कम द्यायची आणि त्यावर अगदी अल्प व्याज आईकडून घ्यायची.
तेव्हापासूनच तिला बचतीचे महत्त्व आणि त्याचे फायदे समजले होते. पैसे वाचवण्यासाठी ती शाळेत, महाविद्यालयात एकतर पायी जायची अथवा सार्वजनिक वाहतुकीचा वापर करायची. त्या बचतीतूनच तिने मोठी रक्कम उभारली.

शिक्षण पूर्ण झाल्यावर तिने नोकरीसाठी हालचाल केली. तिला आयटी कंपनीत नोकरी मिळाली. तिचे काही सहकारी फावल्या वेळेत शेअर बाजारात ट्रेडिंग करायचे. तेव्हा तिला शेअर बाजाराची आवड लागली. ट्रेडींग करण्यासाठी लागणारे प्रशिक्षण तिने पूर्ण केले. युट्यूबवरून बरेच काही शिकली.


# न्यूयार्कच्या व्हिलापेक्षाही महाग फ्लॅट



भारतातील वाढत्या महागाईच्या पार्श्वभूमीवर लहान शहरांमध्येही घर खरेदी करणे लोकांना कठीण होत आहे. त्यामुळे अशा परिस्थितीत कोणत्याही मध्यमवर्गीय व्यक्तीला मोठ्या शहरांबद्दल, विशेषत: गुरूग्राम, बेंगळुरू आणि मुंबईबद्दल बोलणे देखील आवडणार नाही. कारण तेथील मालमत्तांचे दर गगनाला भिडलेले आहेत. गुरुग'ामचे फ्लॅट न्यूयॉर्कच्या व्हिलापेक्षा महाग असल्याचे सांगण्यात आले आहे. व्यवस्थापन सल्लागार गुर्जोत अहलुवालिया यांनी सोशल मीडियावर एक पोस्ट शेअर केली. त्यात त्यांनी सांगितले, की डीएलएफ मॅग्नोलियास, गुडगावमधील फोर बीचके आणि फाईव्ह बीएचके फ्लॅटची किंमत न्यूयॉर्कमध्ये विकल्या जाणाऱ्या सहा बीचके पेंटहाऊसपेक्षा जास्त आहे. गुर्जोतने सोशल मीडियावर शेअर केलेल्या पोस्टमध्ये असे सांगण्यात आले आहे, की डीएलएफ मॅग्नोलियासमधील अपार्टमेंटमध्ये स्विमिंग पूल, स्पा, जिम, ग्रीन गार्डन आणि कार कव्हर्ड पार्किंग यासार'या शाही सुविधा आहेत, तर न्यूयॉर्कमधील सहा बीएचके पेंटहाऊसमध्येही हीच सुविधा आहे. गुरुग'ाममधील भाडेही कोणत्याही घराच्या किमतीपेक्षा कमी नाही. या रकमेत तुम्हाला दुबईमध्ये बुर्ज खलिफाच्या दृश्यासह १२ हजार स्क्वेअर फुटांचा व्हिला मिळेल.

# कुलुपंही झाली स्मार्ट!

आत्तापर्यंत आपण स्मार्टफोन, स्मार्टवॉचबद्दल ऐकलं आहे. पण आता कुलुपंही स्मार्ट झाली आहेत. ही कुलुपं चावीने नाही तर आपल्या बोटांच्या स्पर्शाने उघडतील. फिंगरप्रिंट सेन्सर असणारी ही कुलुपं सध्या चर्चेचा विषय ठरली आहेत. सध्या ८०० रुपयांपासून २५०० रुपयांपर्यंतची स्मार्ट कुलुपं उपलब्ध असून दारं, कपाट यापैकी कशाहीसाठी त्यांचा वापर करता येईल. ही कुलुपं वॉटरप्रूफही असतात. या कुलुपांमध्ये बॅटरी बसवण्यात आली असून ती पूर्ण चार्ज करावी लागते. बॅटरी एकदा चार्ज केल्यानंतर कुलुप तीन ते चार दिवस वापरता येतं. कुलुपावरचा फिंगरप्रिंट स्कॅनर तीन सेकंद दाबून धरा. यानंतर निळा लाईट लागेल. यानंतर कोणत्याही एका बोटाने कुलुपाला दहा वेळा स्पर्श करून लॉक सेट करा. या काळात हिरवा लाईट लागेल. शेवटी बीप आवाज आला की लॉक सेट होईल. या कुलुपावर दहा लोकांचा फिंगरप्रिंट डाटा सेव्ह रहातो. म्हणजे घरातल्या व्यक्ती अगदी सहज हे कुलुप उघडू शकतात. याच पद्धतीने डाटा काढूनही टाकता येतो. ॲपच्या मदतीनेही हे कुलुप वापरता येतं.



# नातवाने परत केली मूर्ती

साधारण १०० वर्षांपूर्वी आजोबांनी चोरलेली मंदिरातली मूर्ती नातवाने परत दिली आहे. घरात संकटं येऊ नयेत, म्हणून त्याने ही मूर्ती मंदिर प्रशासनाला परत केली. द्रौपदी अम्माची ही मूर्ती ७०० वर्षांपूर्वीची असल्याचं म्हटलं जातं. मदुराईच्या मेलोर मंदिरातल्या पुजाऱ्यांनी १९१५ मध्ये ही मूर्ती चोरली होती. करप्पास्वामी असं या पुजाऱ्याचं नाव होतं. मेलोरच्या या मंदिरात दोन पुजारी होते. करप्पास्वामींचं दुसऱ्या पुजाऱ्याशी भांडण झालं. त्यानंतर त्याने ही मूर्ती चोरली. मंदिरातली मूर्ती चोरीला गेल्याची तक्रार त्यावेळी ब्रिटिश पोलिसांकडे करण्यात आली होती. मात्र यातून फार काही निष्पन्न झालं नाही. करप्पास्वामीचा नातू मुरूगन आता ६० वर्षांचा आहे. लहानपणी आजोबांना भिंतीकडे तोंड करून पूजा करताना पाहिल्याचं त्याला आठवतं. त्यामुळे आजोबांनी मूर्ती भिंतीत लपवल्याचा संशय त्याला आला. आजोबांनी चोरलेल्या या मूर्तीमुळे घरात बरीच संकटं आली. काहींचा अकाली मृत्यू झाला. सतत आजारपणं असायची. या सगळ्याला घाबरून मुरूगनने मूर्ती परत करण्याचा निर्णय घेतला. ही मूर्ती मंदिरात पुन्हा स्थापन करण्यात येणार आहे.






# पर्यावरण रक्षणासाठी...

कचऱ्याची समस्या अवघ्या जगभरात बिकट होत चालली आहे. त्यातही प्लास्टिकचा कचरा डोकेदुखी बनला आहे. त्यामुळे प्लास्टिकला पर्याय शोधण्याचा प्रयत्न होत असतो. पर्यावरणपूरक वस्तूंचा वापर करण्यावर भर दिला जातो.
जगभरात याबाबत जागरूकता निर्माण केली जात आहे. प्लास्टिकचा पुर्नवापर करण्याचा प्रयत्न होत आहे. पर्यावरणबचतीचा संदेश देण्यासाठी अमेरिकेतल्या अटलांटा पब्लिक स्कूलचे २४०० विद्यार्थी पदवीनदान समारंभात प्लास्टिक रिसायकल करून बनवलेल्या टोप्या आणि गाऊन वापरणार आहेत. मध्यंतरी अर्थ वीक साजरा करण्यात आला. त्या दरम्यान शीतपेय बनवणाऱ्या एका कंपनीने अटलांटा आणि आसपासच्या शहरांमधून प्लास्टिकच्या बाटल्या गोळा केल्या. इतर ठिकाणीही असं अभियान राबवण्यात येणार आहे. या बाटल्या रिसायकल करून २४०० विद्यार्थ्यांसाठी टोपी आणि गाऊन तयार करण्यात येतील. या बाटल्या वेस्ट रॉक रिसायकलिंग प्लांटमध्ये नेल्या जातील. तिथे त्या स्वच्छ करण्यात येतील. मग त्याचं रुपांतर पॅलेट्समध्ये केलं जाईल. त्यानंतर यापासून पॉलिस्टर धागे आणि कापड तयार केलं जाईल. यापासून टोप्या आणि गाऊन तयार होतील.

# फक्त गरुडांसाठी...

अबुधाबीमध्ये फक्त गरूडांसाठीचं रुग्णालय बांधण्यात आलं आहे. हे गरूडांचं जगातलं सर्वात मोठं रुग्णालय ठरल्याचा दावा करण्यात आला आहे. इथे फक्त गरुडांवरच उपचार केले जातात. इथे आजारी गरुडांच्या देखरेखीसोबतच त्यांच्यावर शस्त्रक्रियाही केली जाते. या रुग्णालयात सर्व अत्याधुनिक सोयी-सुविधा उपलब्ध आहेत. गरुडांसाठी वेटिंग रूम, आपत्कालीन वैद्यकीय विभाग आणि ऑपरेशन थिएटरही आहे. अरब देशांमध्ये गरुड पाळणं हे श्रीमंतीचं लक्षण मानलं जात असल्याने बरेच शेख हा पक्षी पाळतात. त्यामुळे खास गरुडांना वाहिलेलं रुग्णालय इथे बांधण्यात आलं. या रुग्णालयात आजारी गरुडाला उपचारांसाठी आणलं जातं. फाल्कन असं या रुग्णालयाचं नाव आहे. या रुग्णालयाला सरकारकडून आर्थिक मदत मिळते. इथे गरुडांवर संशोधनही केलं जातं. माफक दरात या पक्ष्यांवर उपचार केले जातात. इथे गरुडांना प्रशिक्षणही दिलं जातं.





# अशी केली भटकंती

भटकंती करण्याची मजा काही औरच. अमेरिकेचा मिका मेयर तीन वर्षांमध्ये देशातली महत्त्वाची पर्यटनस्थळं फिरला. त्याने ४१९ ठिकाणांना भेटी दिल्या. त्यात राष्ट्रीय उद्यानांचाही समावेश आहे. ही भटकंती करताना तो रेल्वे, विमान आणि बोटीने फिरला. त्याने राफ्टिंगही केलं. यासोबत तो गाडीनेही फिरला. देशातली महत्त्वाची ठिकाणं फिरण्यासाठी त्याने एक लाख वीस हजार किलोमीटर अंतर पार केलं. देशात सर्व दिशांना तो फिरला. एकाच टप्प्यात अमेरिकेतल्या ४१९ पर्यटनस्थळांना भेट देणारे आपण एकमेव व्यक्ती असल्याचं मिका मेयरचं म्हणणं आहे. मेयरची ही भटकंती २९ एप्रिलला संपली. शेवटच्या टप्प्यात त्याने लिंकन मेमोरियलला भेट दिली. मिकाला देशाचा इतिहास जाणून घ्यायचा होता. तीन वर्षांपूर्वी अवघे काही डॉलर खिशात घेऊन त्याचा हा प्रवास सुरू झाला. मधल्या काळात कुटुंबिय, मित्रमंडळी, कॉर्पोरेट कंपन्या आणि चर्चने त्यांना आर्थिक मदत दिली. अमेरिकेतली महत्त्वाची ४१९ ठिकाणं फिरणाऱ्या ख्रिस काल्वर्ट यांचीही त्याने भेट घेतली. ख्रिसने वयाच्या सतराव्या वर्षी ही ठिकाणं फिरायला सुरुवात केली होती. ही सर्व ठिकाणं फिरेपर्यंत तो पन्नास वर्षांचा झाला होता. त्यामुळे मिकाची कामगिरी महत्त्वाची मानली जात आहे.

# श्री रामकृष्ण अर्बन सहकारी क्रेडिट सोसायटीच्या अध्यक्षपदी श्रीगोपाल धूत तर उपाध्यक्षपदी ओमप्रकाश चांडक यांची निवड



नगर – श्री रामकृष्ण अर्बन क्रेडिट सोसायटीच्या संचालक मंडळाची सभा, संस्थेच्या मुख्य कार्यालयात सहकारी संस्था अधिकारी व्ही. पी. अळकुटे यांच्या अध्यक्षतेखाली नुकतीच पार पडली. या सभेत संस्थेच्या अध्यक्षपदासाठी श्रीगोपाल धूत यांची तसेच उपाध्यक्षपदी ओमप्रकाश चांडक यांची एकमताने बिनविरोध निवड झाली.

अध्यक्षपदासाठी श्री. धूत यांच्या नावाची सुचना संचालक राजेंद्र गुजराथी यांनी केली व संचालक मधुसूदन सारडा यांनी त्यास अनुमोदन दिले. तसेच उपाध्यक्षपदासाठी श्री. चांडक यांच्या नावाची सुचना ॲड. अशोक बंग यांनी केली व त्यास सुधीर झालानी यांनी अनुमोदन दिले.

सभेचे अध्यक्ष व्हि. पी. अळकुटे यांचा संस्थेतर्फे नूतन अध्यक्ष श्रीगोपाल धूत यांनी सत्कार केला. श्रीगोपाल धूत यांनी निवडीनंतर बोलताना सांगितले की, संस्थेला ३९ वर्षांची आदर्श कारभाराची परंपरा आहे. मावळते अध्यक्ष गोपाल मणियार, उपाध्यक्ष मधुसूदन सारडा यांनी अतिशय चांगले काम करून संस्थेची घौडदौड कायम राखली. आजमितीला संस्थेकडे ८३ कोटी २० लाख रुपयांच्या ठेवी आहेत. कर्ज वितरण ४७ कोटी ८३ लाख रुपये इतके आहे. संस्था फक्त ७ टक्के व्याजदराने सोनेतारण कर्ज देते. त्याला मोठा प्रतिसाद असून सोने तारण कर्जासाठी शहरातील विविध भागात काउंटर सुरू करण्यात येणार आहे.

संस्थेने स्थापनेपासून सभासदांना १५ टक्के लाभांशाची परंपरा जपली आहे. संस्थेत वेअर हाऊस कर्ज, नजर गहाण कर्ज सुविधा उपलब्ध आहेत. सभासदांचा विश्वास आणि सर्व संचालक मंडळाचे विश्वस्त भावनेने काम करण्याची पद्धत संस्थेचे मुख्य वैशिष्ट्य आहे. आगामी काळात संस्थेची मुख्य शाखेचे नूतनीकृत केली जाईल अशी ग्वाही त्यांनी दिली.

यावेळी मावळते अध्यक्ष गोपाल मणियार, उपाध्यक्ष मधुसूदन सारडा यांनी मनोगत व्यक्त करताना संस्थेच्या प्रगतीचा आढावा घेत श्रीगोपाल धूत यांच्या मार्गदर्शनाखाली संस्थेच्या प्रगतीत योगदान दिल्याचे समाधान असल्याचे सांगितले.

याप्रसंगी संचालक राजेंद्र गुजराथी, सुधीर झालानी, प्रकाश गांधी, जगदीशप्रसाद दरक, किसनलाल बंग, विश्वनाथ कासट, गोपाल मणियार, राजेंद्र मालू, मधुसूदन सारडा, ॲड. अशोक बंग, राजेंद्रकुमार कंत्रोड, अनुरिता झगडे, देवराव साठे, व्यवस्थापक शशिकांत पुंडलिक व कार्यासन अधिकारी कुमार आपटे उपस्थित होते. नूतन पदाधिकाऱ्यांचे उपस्थित संचालकांनी अभिनंदन केले. संचालक राजेंद्र गुजराथी यांनी आभार मानले.

# जिल्हास्तर रोल बॉल स्पर्धा व राज्य स्पर्धा संघ निवड चाचणीचे आयोजन

नगर – अहिल्यानगर जिल्हा रोल बॉल स्पर्धा व राज्य स्पर्धा साठी जिल्हा संघ निवड चाचणी चे आयोजन संघटनेच्या वतीने ११वर्ष मुले व मुली तसेच १७ वर्ष मुले व मुलांकरीता २४ नोव्हेंबरला जिल्हा क्रीडा संकुल वाडिया पार्क येथे आयोजित करण्यात आलेल्या आहेत. अशी माहिती संघटना सचिव प्रशांत पाटोळे यांनी दिली.

या स्पर्धांसाठी ११ वर्ष मुले व मुली जन्म वर्ष २०१४ तसेच १७ वर्ष मुले व मुली जन्म वर्ष २००८ व पुढील खेळाडू सहभाग घेवू शकतात अशी माहिती श्रीरामपूर तालुका सचिव आनंद पटेकर यांनी दिली.

वरील नमूद स्पर्धांमधून उत्कृष्ट खेळाडू यांची निवड जिल्हा संघात होईल व हा संघ राज्य स्पर्धांसाठी अहील्यानागर चे प्रतिनिधित्व करेल, ईयत्ता १० वी तील खेळाडूंना या स्पर्धांचा क्रीडा गुण सवलतीसाठी लाभ होईल. जन्म पुराव्यासाठी जन्मदाखला, बोनाफाईड सर्टिफिकेट अनिवार्य असेल, आपला संघ नेसल तर व्यातिक स्केटिंग खेळाडू निवड चाचणी करीता अर्ज करू शकतो. अशी माहिती जामखेड तालुका संघटना सचिव सचिन अल्कुटे यांनी दिली.

स्पर्धांचा लाभ जास्तीत जास्त खेळाडूंना मिळावा यासाठी जिल्ह्यातील पात्र खेळाडूंनी सहभाग नोंदवावा असे आवाहन अध्यक्ष प्रदीप पाटोळे यांनी केले.

अधिक माहिती करीता श्रीरामपूर तालुका सचिव आनंद पटेकर ९८९०७४४४९०, जामखेड तालुका सचिव सचिन अलकुटे, श्रीगोंदा तालुका सचिव सिद्धेश्वर आनंदकर ७०५८३७०३७७ किंवा जिल्हा संघटना सचिव प्रशांत पाटोळे ८०८७८७९८९९ व अध्यक्ष प्रदीप पाटोळे ८२७५१९१७७१ यांच्याशी संपर्क साधावा.



अरणगाव येथील वर्का चॅरिटेबल ट्रस्टच्या वर्का स्कूल ॲण्ड ज्युनियर कॉलेज मध्ये रस्ता सुरक्षा विषयी शपथ घेताना विद्यार्थी.

# वर्का स्कूलमध्ये विद्यार्थ्यांनी घेतली रस्ता सुरक्षा विषयी शपथ

नगर – अरणगाव येथील वर्का चॅरिटेबल ट्रस्टच्या वर्का स्कूल ॲण्ड ज्युनियर कॉलेज–मध्ये रस्ता सुरक्षा – जनजागृती कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी विद्यार्थ्यांनी रस्ता सुरक्षा विषयक शपथ घेतली.

यावेळी शिल्पा धोपावकर आणि साहूल आल्हाट यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. रस्त्यावर चालताना प्रत्येकाने कोणती काळजी घेतली पाहिजे, तसेच स्वतःच्या सुरक्षे सोबतच इतरांच्या सुरक्षेची ही काळजी कशी घ्यावी याचे मार्गदर्शन करण्यात आले. तसेच छोट्या छोट्या व्हिडिओद्वारे वाहतुकीचे नियम, घ्यावयाची काळजी, सुरक्षेची उपकरणे, विचलित ड्रायव्हिंगची कारणे, निरोगी दृष्टी म्हणजे काय इत्यादी विषयी ही मार्गदर्शन करण्यात आले.

वर्का स्कूल अँड ज्युनिअर कॉलेजचे प्राचार्य डॉक्टर रामीन हुसेन व फिनिक्स अकॅडमीच्या प्राचार्या सौ. मिताली वाजपेयी यांना 'वाटचाल' हे पुस्तक भेट म्हणून देण्यात आले आणि उपस्थित विद्यार्थ्यांना प्रशस्तीपत्रक देण्यात आले. वर्का स्कूल अँड ज्युनिअर कॉलेजचे प्राचार्य डॉ. रामीन व फिनिक्स स्कूलच्या प्राचार्या सौ.वाजपेयी यांनीही पाहुण्यांना श्रीफळ देऊन त्यांचे आभार मानले. त्यानंतर आजचे विद्यार्थी हे उद्याचे भावी वाहन चालक असल्यामुळे त्यांच्याकडून रस्ता सुरक्षा विषयी शपथ घेऊन कार्यशाळेचा समारोप करण्यात आला.

# जिल्हास्तरीय तायक्वांदो स्पर्धेत अरणगाव येथील झी स्कूलचे यश

नगर – वाडिया पार्क, अहिल्यानगर येथे झालेल्या खुल्या जिल्हास्तरीय तायक्वांदो स्पर्धेत झी स्कूल अरणगाव दौंड रोड येथील विद्यार्थी चि. अंश अविनाश मुदळ याने १९ किलो वजन गटातील स्पर्धेत ब्राँझ (कास्य) मेडल मिळविले.

या स्पर्धेत जिल्हाभरातील स्पर्धकांनी भाग घेतला होता. तायक्वांदो हा आंतरराष्ट्रीय पातळीवर खेळला जाणारा खेळ आहे. या क्रीडा प्रकारामुळे स्वरक्षणाचे धडे मिळतात, शारीरिक कौशल्ये वाढतात, फिटनेस चांगला राहून शालेय वयातच विद्यार्थ्यांची शारीरिक वाढ चांगली होते. निरोगी शरीरामुळे मन निरोगी राहते व त्याचा फायदा अभ्यासात देखील होतो.

या विद्यार्थ्याचा शाळेच्या वतीने अध्यक्ष सुनील लोटके यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. प्राचार्या प्रा. शैलजा लोटके यांनी त्यांचे अभिनंदन केले. खेळाडूंना क्रीडाशिक्षक वसीम शेख यांनी मार्गदर्शन केले.



तायक्वांदो स्पर्धेत अरणगाव–दौंड रोड येथील झी स्कूलचा विद्यार्थी चि. अंश अविनाश मुदळ या विद्यार्थ्याने कांस्यपदक मिळविल्याबद्दल त्याचा सत्कार करताना अध्यक्ष सुनील लोटके. समवेत प्राचार्या शैलजा लोटके, क्रिडाशिक्षक वसीम शेख.



ड्राय डे च्या दिवशी दारू विक्री करणाऱ्यांवर कारवाई करत जप्त मुद्देमालासह राज्य उत्पादन शुल्क विभागाचे पथक.

# ड्राय डे च्या दिवशी दारू विक्री करणाऱ्यांवर राज्य उत्पादन शुल्क विभागाची कारवाई

**४ लाख ६४ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त**

नगर – विधानसभा सार्वत्रिक निवडणुकीच्या अनुषंगाने कोरडा दिवस (ड्राय डे) कालावधीत १८ आणि १९ नोव्हेंबर या काळात अवैधपणे मद्य विक्री करणाऱ्या हॉटेल व ढाबे चालकांवर राज्य उत्पादन शुल्क विभागाने कारवाई करुन ४ लाख ६४ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला असून १५ व्यक्तींवर कारवाई करण्यात आली असल्याची माहिती विभागाचे अधीक्षक प्रमोद सोनोने यांनी दिली आहे.

कोरडा दिवस (ड्राय डे) कालावधीत ७ हजार ९७० लिटर रसायन, ३०० लिटर हातभट्टी, १८ बल्क लिटर देशी, ४४.५२. बल्क लिटर विदेशी माल जप्त करण्यात आला आहे.

निवडणुकीच्या अनुषंगाने जिल्ह्यात कोरडे दिवस जाहीर करण्यात आले असून या दिवशी कोणत्याही प्रकारची अवैध मद्यविक्री होत असल्याचे आढळल्यास टोल फ्री क्रमांक १८००२३३९९९९, व्हॉटस्अप क्रमांक ८४२२००११३३ अथवा ०२४१–२४७०८६० या क्रमांकावर संपर्क साधण्याचे आवाहनही करण्यात आले आहे.

# बिरसा मुंडा यांच्या १५० व्या जयंतीनिमित्त आदिवासींनी उद्धार व प्रगतीचा संकल्प करावा

## संजय कुलकर्णी यांचे प्रतिपादन; शोभायात्रेने जनजाती गौरव दिन साजरा, जनजाती कल्याण आश्रमाचा उपक्रम



जनजाती योद्धा भगवान बिरसा मुंडा यांच्या १०५ वी जयंती व जनजाती गौरव दिना निमित्त अहिल्यानगर जनजाती कल्याण आश्रमाच्या वतीने शोभायात्रेचे व व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते.

नगर – जनजाती योद्धा भगवान बिरसा मुंडा यांच्या १५० व्या जयंतीनिमित्त आदिवासींनी सुशिक्षित होण्याचा, धर्मांतरण न करण्याचा, संस्कृती जपण्याचा, आरोग्यदायी जीवन जागून समाजाच्या उद्धारासाठी व प्रगतीसाठी संकल्प करणे आवश्यक आहे, संघर्ष करा, संघटिक व्हा, सुशिक्षित व्हा, अन्याया विरोधात संघर्ष करून देशासाठी बलिदान करा, ही बिरसा मुंडा यांची शिकवण व विचार अमलात आणून भारतमातेला मोठे करण्याचा प्रयत्न करू हीच भगवान बिरसा मुंडा यांना योग्य श्रद्धांजली ठरेल, असे प्रतिपादन जनजाती कल्याण आश्रमाचे हितरक्षा प्रमुख संजय कुलकर्णी यांनी केले.

जनजाती योद्धा भगवान बिरसा मुंडा यांची १०५ वी जयंती देशभर जनजाती गौरव दिन म्हणू साजरा करण्यात आला. अहिल्यानगर जनजाती कल्याण आश्रमाच्या वतीने या निमित्ताने भव्य शोभायात्रेचे व व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होत. यानिमित्त जुन्या बसस्थानक जवळील छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्यापासून भव्य शोभायात्रा काढण्यात आली.

सजवलेल्या रथातील भारतमाता, भगवान बिरसा मुंडा, टंट्या भिल्ल यांच्या प्रतिमाचे पूजन रा.स्व.संघाचे पश्चिम महाराष्ट्र प्रांत संघचालक नानासाहेब जाधव, सारडा महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ. माहेश्वरी गावित व अखिल भारतीय वनवासी कल्याण आश्रमाचे हितरक्षा प्रमुख संजय कुलकर्णी यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी जिल्ह्यातील विविध भागांमधून आदिवासी समाजातील नागरिक उपस्थित होते.

यावेळी अहिल्यानगर जनजाती कल्याण आश्रमाचे अध्यक्ष महेंद्र जाखेटे, सचिव निळकंठ ठाकरे, विशारद पेटकर, नगर संघटन मंत्री सोमनाथ पवार, शोभायात्रा प्रमुख प्रशांत आढाव, अनिल लवंडे, उमेश खिंदारे, मिलिंद मुळे, अनंत पुंड, जयंत क्षीरसागर, सतीश कुलकर्णी, प्रा.मच्छिंद्र मालुंजकर आदी पदाधिकारी उपस्थित होते.

संजय कुलकर्णी पुढे म्हणाले, आदिवासी समाज स्वतः गरीब राहून निसर्गाला समृद्ध केले. देशावर आलेल्या प्रत्येक आक्रमणाला सर्वप्रथम धैर्याने तोंड देत देशासाठी बलिदान पत्कारले. अशा आदिवासी समाजाची प्रतिमा जाणूनबुजून डागाळली गेली. आदिवासी समाजातील योद्धा बिरसा मुंडा यांनी इंग्रजांना सळो की पळो करून सोडत आदिवासींच्या संघर्षाची सुरवात केली. मात्र त्यांचे कार्य समाजापुढे आणले गेले नाही.

सध्याच्या केंद्र सरकारने पहिल्यांदाच क्रांतिकारी आदिवासी बिरसामुंडा यांचे कार्य देशापुढे आणण्यासाठी राष्ट्रीय उत्सव सुरु केला. अनेक कायदे, योजना आदिवासींसाठी सुरु केल्या आहेत. मात्र आदिवासी समाज संघटीत नसल्याने यापासून वंचित आहे. आदिवासींनी समाज हितासाठी, न्याय हक्कासाठी संघटित होणे अत्यावश्यक आहे.

प्राचार्य डॉ. माहेश्वरी गावित म्हणाल्या, बिरसा मुंडा यांनी उलगुलान आंदोलन छेडत मातृभूमीसाठी आयुष्यभर काम केले. त्यांनी केवळ आदिवासींसाठीच काम केले नाहीतर संपूर्ण मानवजातीसाठी काम केले आहे. त्यांच्या महान कार्यांची प्रेरणा घेवून सर्व आदिवासी समाजाने देशसेवा करावी, असे आवाहन केले.

रा.स्व.संघाचे नानासाहेब जाधव म्हणाले, जनजाती समजावर कायम अन्याय होत आहेत. आदिवासी समाज संघटीत नसल्याने इतरांचे फावत आहे. त्यामुळे जनस्जाती समाजामध्ये जनजागृती करून संघटीक होण्यासाठी जनजाती कल्याण आश्रम करत असलेल कार्य कौतुकास्पद आहे. येणाऱ्या काळात परकीयांकडून मोठ्या प्रमाणात अक्रमने होण्याची शक्यता असल्याने सर्वांनी सतर्क रहावे.

मेळाव्याचे प्रास्ताविकात नगर संघटन मंत्री सोमनाथ पवार बिरसा मुंडा यांच्या कार्याची माहिती देऊन कार्यक्रमाच्या आयोजना मागची भूमिका विशद केली. विशारद पेटकर यांनी सूत्रसंचालन केले. मिलिंद मुळे यांनी आभार मानले.

आदिवासींची आराध्यदैवत येडू माईच्या ओव्यांनी कार्यक्रमाची सांगता झाली.



मौलाना आझाद हायस्कूल व सावित्रीबाई फुले शाळेत बालदिन साजरा करताना पंडित जवाहरलाल नेहरू यांना अभिवादन करताना संस्थेचे प्रमुख कार्यवाह प्रा.डॉ. अब्दुस सलाम. समवेत प्राचार्या फरहाना सय्यद, मुख्याध्यापक नौशाद सय्यद, शिक्षक–शिक्षिका व विद्यार्थी.

# मौलाना आझाद उर्दू हायस्कूल व सावित्रीबाई फुले शाळेत बाल दिवस साजरा

नगर – लहान मुलांबद्दल पंडित जवाहरलाल नेहरू यांना असलेले प्रेम हे जग जाहीर आहे. त्याच्या मागे एकच कारण आहे की येणारी पिढी ही देशाचा भविष्य असते.ते घडविण्याचे काम उत्तमरीत्या पंडित जवाहरलाल नेहरू यांनी आपल्या कार्यकाळात उत्तमरीत्या पार पाडले होते. त्यामुळेच आजचा युवा वर्ग त्या सुविधांचा आज पण उच्च शिक्षणासाठी भरपूर उपभोग घेत आहे. व त्यामुळेच पंडित जवाहरलाल नेहरू यांचा वाढदिवस बाल दिवस म्हणून साजरा केला जातो, असे प्रतिपादन मोहम्मदिया एज्युकेशन अँड वेल्फेअर सोसायटीचे संस्थापक व प्रमुख कार्यवाह प्रा. डॉ. अब्दुस सलाम सर यांनी केले.

मोहम्मदीया एज्युकेशन अँड वेल्फेअर सोसायटीच्या मौलाना आझाद उर्दू हायस्कूल व सावित्रीबाई फुले उर्दू कन्या शाळांमध्ये देशाचे पहिले प्रधानमंत्री पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या १३५ व्या वाढदिवसानिमित्त बाल दिवस साजरा करण्यात आला. याप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून संस्थेचे संस्थापक व प्रमुख कार्यवाह प्रा. डॉ. अब्दुस सलाम सर यांनी पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण केले.

यावेळी प्राचार्या फरहाना सय्यद, मुख्याध्यापक नौशाद सैय्यद, असलम पटेल, फरीदा जहागिरदार, सोलापूरे नाहीद, नाजेमा शेख, खतीजा खान, नफीस अंजुम, सदफ शेख, शेख शाहीन, शेख फरजाना, शेख सुलताना, शेख मुमताज, शेख यास्मिन, शेख हिना आदी उपस्थित होते.

याप्रसंगी मौलाना आझाद हायस्कूलच्या विद्यार्थिनींनी कॅन्टीन दिवसाचा आनंद घेतला. व पाचवीच्या मुलींनी बालगीते सादर केली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अंजुम खान यांनी केले. तर आभार यास्मिन शेख यांनी मानले.



**दिव्यांगांनी बजावला मतदानाचा हक्क...**

शंभर टक्के दिव्यांग असलेल्या नचिकेत बाबासाहेब बोडखे यांनी नगर शहर विधानसभा मतदार संघात मतदानाचा हक्क बजावला.





**मतदान प्रक्रियेवर जिल्हाधिकाऱ्याचे वेब कास्टिगच्या माध्यमातून लक्ष**

जिल्हाधिकारी सिद्धाराम सालीमठ यांनी स्वतः जिल्हा नियंत्रण कक्षातून वेबकास्टिंगच्या माध्यमातून मतदान प्रक्रियेवर लक्ष ठेऊन आहेत.



लोकशाहीचा चौथा स्तंभ पत्रकार आपले मतदानाचे कर्तव्य बजाऊन आल्या नंतर समाज कल्याण दिव्यांग विभागाकडुन दिव्यांग नोडल अधिकारी शिवानंद भांगरे, बाबासाहेब झावरे, सुदाम चौधरी यांनी पत्रकार संदिप दिवटे यांचा पुष्पगुच्छ देऊन सत्कार करताना.

